www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार

तरुणांचा बुलंद आवाज
मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड, आलिबाग खोपोली, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर


मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 268 वा गुरुवार दि. 12 जून २०२५ किंमत : 2 रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

### महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा अधिकारी अभियंता पाईप लाईन फुटली दुर्लक्ष



दै युवक आधार
उल्हासनगर/रशीद शेख

उल्हासनगर नंबर 04 सुभाष टेकडी तक्षशिला विद्यालय जवळ उल्हासनगर नंबर 04परीसरात पाण्यासाठी नागरीकांना वणवण भटकावे लागत असतांना मात्र महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाचा ढीसाळ कारभारामुळे लाखो लिटर पीण्याचे पाणी गटारात वाया जात आहे.पाण्याची पाईप लाईन फुटली. बेजबाबदार कार्यकारी अभियंता घुले, परमेश्वर बुडगे, अश्विन राठोड यांची पदावरून त्वरित हकालपट्टी करा..जनतेची मागणी होत आहे घटनेकडे दुर्लक्ष करणे फक्त आपला पगार आणि पद हेंच महत्वाचे आहे बाकी काही देणं घेणं नाही हेंच चाललंय आता हेच खातं नाही तर सर्वच सरकारी अधिकारीच्या बोंबाबोंब आता सध्या चालू आहे

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाण्याखालील संग्रहालयाचा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे शुभारंभ

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

आयएनएस गुलदार या नौदलातून सेवानिवृत्त झालेल्या युद्धनौकेचे पाण्याखालील संग्रहालय आणि जहाजाभोवती कृत्रिम प्रवाळ निर्माण करण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील निवती रॉक जवळ हा प्रकल्प होणार असून याचा शुभारंभ दूरदृश्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व



बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. भारतातील हा पहिलाच उपक्रम असून यामुळे सागरी संवर्धन व पर्यटनाला चालना मिळणार आहे. समुद्रात विराजमान होणाऱ्या जहाजाभोवती प्रवाळ निर्मिती होऊन त्याद्वारे स्कुबा डायव्हिंग व भविष्यात पाणबुडीद्वारे पर्यटन करता येणे शक्य होणार आहे. केंद्र शासनाने ऐतिहासिक पाऊल उचलत भारतीय नौदलाचे निवृत्त जहाज आयएनएस गुलदार हे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे सुपूर्द केले आहे. जगातील अनेक देशात असे प्रकल्प तयार केले आहेत. हा प्रकल्प तयार करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या मान्यतेने भारतीय नौदलाने निवृत्त युद्धनौका महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास विना मोबदला उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, दूरदृश्य प्रणालीद्वारे सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माणिक दिवे, जिल्हा पोलीस अधीक्षक मोहन दहीकर सहभागी झाले.

**सेवानिवृत्त जहाजाचे स्वरूप**

या जहाजाचे 1,120 टन वजन आहे. तर 83.9 मीटर लांबी असून 9.7मीटर रुंदी आहे. 5.2 मीटर इतकी खोली आहे. हे जहाज 12 जानेवारी 2024रोजी सेवानिवृत्त झाले आहे. केंद्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनस्थळांचा विकास करणे या योजनेंतर्गत 'स्पेशल असिस्टंट्स टू स्टेटस फॉर कॅपिटल इन्व्हेस्टमेंट' (भाग3) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा आयएनएस गुलदार सेवानिवृत्त युद्धनौका निवती रॉक जवळ समुद्रात पाण्याखालील संग्रहालय आणि कृत्रिम रीफमध्ये रूपांतरित करणे, स्कुबा डायव्हिंग व भविष्यात पाणबुडीद्वारे पर्यटन करता येणे शक्य होणार आहे.या प्रकल्पास केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने 27 डिसेंबर 2024 रोजी रु.46.91कोटीस मान्यता दिली आहे. भारतीय नौदलाने सदरचे निवृत्त जहाज पोर्टब्लेअर, अंदमान येथून कारवार नेव्हल बेस, कर्नाटक याठिकाणी स्वखर्चाने पोहोच करण्याची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची विनंती मान्य केली, ज्यामुळे राज्य शासनाची आर्थिक बचत झाली आहे.

**प्रकल्पाचे टप्पे**

भारतीय नौदलाकडून बोटीचा अधिकृतरित्या 22 फेब्रुवारी 2024 रोजी कारवार नेवल बेस येथे बोटीचा अधिकृत ताबा घेण्यात आला. कारवार येथून विजयदुर्ग जिल्हा सिंधुदुर्ग येथे जहाज घेऊन (Tow) येणे. हे जहाज 16 मार्च 2025 रोजी यशस्वीरित्या कारवार येथून विजयदुर्ग येथील महाराष्ट्र सागरी मंडळाच्या जेट्टीवर सुरक्षितरित्या आणण्यात आले आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या (एमएमबी) विजयदुर्ग येथील जेट्टीला विना मोबदला साधारणपणे सहा ते सात महिने सदरचे जहाज सुरक्षितरित्या ठेवण्याकरिता परवानगी देण्यात आली आहे. जहाजाची पर्यावरणीय साफसफाई करण्याकरिता नियुक्त केलेल्या संस्थेने या जहाजाची 15एप्रिल 2025 रोजी पूर्णपणे पर्यावरणीयदृष्ट्या साफसफाई केली आहे. आयएनएस गुलदार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्राच्या तळाशी निवती रॉक येथील येथे विराजमान करण्याकरिता माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांना 16 एप्रिल 2025 रोजी कार्यादेश देण्यात आला असून वातावरण अनुकूल असेल त्या दिवशी प्रत्यक्षपणे ही कार्यवाही पार पाडली जाणार आहे. समुद्रात विराजमान होणाऱ्या जहाजाभोवती प्रवाळ निर्मिती होऊन त्याद्वारे स्कुबा डायव्हिंग व भविष्यात पाणबुडीद्वारे पर्यटकांना या प्रवाळ व समुद्रतळाशी विराजमान जहाजाची सफर करण्याचे नियोजितकरण्यत आले आहे.

# नांदेड-देगलुर महामार्गावरील बिजूर, ता. बिलोली येथे शिवनेरी पोद्दार इंग्रजी शाळेच्या उद्घाटन सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

बिजूर, ता. बिलोली येथे शिवनेरी पोद्दार इंग्रजी शाळेच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या नव्या शैक्षणिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व आधुनिक शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. बाबासाहेब पाटील सहकार मंत्री,डॉ खा.अजित गोपछेडे, खासदार मा. रविंद्र चव्हाण नांदेड लोकसभा, मा. बालाजी पाटील खतगावकर, सनदी अधिकारी, माजी आमदार मा. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, तसेच मा. श्रावण पाटील भिलवंडे, माधवराव मिसाळे गुरूजी, बाळासाहेब पाटील



खतगावकर, माणिकराव लोहगावे, मारोती राहिरे, भास्करराव भिलवंडे, डॉ. हणमंतराव लखमपुरे, अभिजीत धरमुरे, रुपेश पाटील भोकसखेडकर यांच्यासह शाळेचे सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात सहभागी होऊन समाजासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील या उपक्रमास समर्थन देण्याची संधी लाभली. भविष्यातील पिढी घडवण्याच्या या कार्यात प्रत्येकाने पुढे येणे ही काळाची गरज आहे. या अभिनव उपक्रमासाठी आयोजकांचे व सहभागी सर्व मान्यवरांचे उपस्थिती

# प्रशांत नाईक यांचा स्तुत्य उपक्रम ; अलिबाग रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्वखर्चाने पुढाकार

## वटपौर्णिमेला 'वड' लावलेल्या सत्यवानांचे आंदोलन यशस्वी; अखेर रस्त्यांची दुरुस्ती सुरू

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा

अलिबाग शहराच्या प्रवेशद्वारावरील खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी खड्ड्यांमध्ये वडाची झाडं लावून अनोख्या प्रकारे आंदोलन करणाऱ्या सत्यवानांच्या कल्पक निदर्शनानंतर ही बाब प्रकाशात आली होती. त्याचा परिणाम म्हणून अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी स्वखर्चाने रस्त्यांची दुरुस्ती सुरू करत सामाजिक बांधिलकीचं उत्तम उदाहरण समाजासमोर मांडलं आहे.चेंढरे बायपास, निलिमा हॉटेल, रेवदंडा बायपास रोड परिसरात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले होते. यामुळे नागरिक, विद्यार्थी, रुग्ण आणि पर्यटक यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. वारंवार तक्रारी करूनही बांधकाम विभाग आणि प्रशासन याकडे दुर्लक्ष करत होते. प्रशांत नाईक यांनी मात्र ही समस्या गांभीर्याने घेत, प्रशासनाकडे निवेदन देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने स्वतः पुढाकार घेतला. बुधवारी (दि. ११ जून) सकाळपासून त्यांनी स्वतः जेसीबीच्या सहाय्याने काम सुरू करून खड्डे समपातळी केले आणि त्या ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसवण्याचे काम सुरू केले. या उपक्रमामुळे पावसाळ्यातील खड्ड्यांमधून प्रवासाचा त्रास कमी होणार असून अपघातांचा धोका टळणार आहे. शासनाच्या निष्क्रियतेच्या पार्श्वभूमीवर नाईक यांचा हा पुढाकार नागरिकांच्या सुखद अनुभवाचे कारण ठरत आहे.स्थानिक नागरिकांनी त्यांच्या या कृतीचे स्वागत करत सोशल मीडियावर आणि प्रत्यक्ष भेटीतून त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. दुसरीकडे, बांधकाम विभागाच्या उदासीनतेवर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.प्रशांत नाईक यांचे हे सामाजिक योगदान केवळ अलिबागपुरते मर्यादित न राहता इतर लोकप्रतिनिधींनाही प्रेरणा देणारे ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# समाजसेवक मुकुंद कांबळे यांना 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५'सन्मानित.

दैनिक युवक आधार
मुंबई प्रतिनिधी – शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने स्वराज्य प्रतिष्ठान (रजि.), हुतात्मा बाबू गेनू स्मारक समिती (नियोजित), आणि धडक कामगार युनियन महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५' वितरण सोहळा दि. ८ जून २०२५ रोजी दादर (मुंबई) येथे मोठ्या थाटात पार पडला. या कार्यक्रमात समाजसेवक मा. मुकुंद शंकर कांबळे यांना समाजकार्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, मा. रामराजे नाईक – निंबाळकर, मा. प्रमोद आप्पा पाटील, मा. अभिजीत दादा राणे, मा. शीतल शिवराम माडशेरे, मा. संभाजी राजे जाधवखराड, व इतर मान्यवर उपस्थित होते. स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येतो. प्रमाणपत्राद्वारे त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून, राज्यस्तरावरून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.




# रिसोड मालेगावचा पाणी प्रश्न अनंतराव देशमुख,नकुल देशमुख यांच्या पाठपुराव्यानंतर मार्गी–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### –अकोला येथील सभेत मुख्यमंत्र्याचे प्रतिपादन

दैनिक युवक आधार
रिसोड - तालुका प्रतिनिधी.
रणजीत सिंह ठाकुर.

.. रिसोड शहर वाढीव पाणी आरक्षण आणि मालेगाव शहर चाकातीर्थ जलाशयातून मालेगाव शहरासाठी पाणी पुरवठा ह्या दोन्ही मागण्या अनंतराव देशमुख,नकुल देशमुख यांनी रिसोड येथे संकल्प सभेत केल्या होत्या. त्या दोन्ही मागण्या आपण मार्गी लावल्या आहेत त्यांना मान्यता दिली असून लवकरच काम आपण करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोला येथे विकास संवाद सभेत बोलतांना केले.रिसोड येथे संकल्प सभेत देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना माजी मंत्री अनंतराव देशमुख, भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख नकुल देशमुख यांनी रिसोड शहर वाढीव पाणी पुरवठा आणि मालेगाव शहरास चाकातीर्थ जलाशयातून पाणी पुरवठा काम होण्याची मागणी केली होती. त्या दोन्ही मागण्या पूर्ण करण्याचा शब्द तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभेदरम्यान दिला होता,शब्द पळत देवेंद्र फडणवीस यांनी त्या दोन्ही कामास मान्यता दिली होती.अकोला येथे तब्बल तीन हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले,कामगार मंत्री अकोला पालकमंत्री आकाश फुंडकर, माजी मंत्री अनंतराव देशमुख, भाजप महाराष्ट्र सरचिटणीस



आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे,आमदार शाम खोडे,भाजप निवडणुक प्रमुख रिसोड मालेगाव विधानसभा नकुल देशमुख,वाशिम जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे सहित मान्यवार व्यासपीठावर उपस्थित होते.

# पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांनी दिले कबुतराला जीवदान

## वडाला बांधलेल्या धाग्यात अडकला पाया










दैनिक युवक आधार संपादक
संतोष शिवदास आमले

वटपौर्णिमेच्या निमित्ताने वडाच्या झाडाला बांधलेल्या धाग्यात एका कबुतराचा पाय अडकून तो हालहाल करत होता. ही दुर्दशा पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तिथे असलेल्या पुष्पा आवटे यांना सोबत घेऊन धागा सोडवला आणि त्या कबुतराला जीवदान दिले. दिलीप कोकाटे यांनी संयम, काळजी आणि माया दाखवत कबुतराला सुरक्षितरीत्या मुक्त केले. नागरिकांनी त्यांच्या या कृत्याचे कौतुक केले असून, धार्मिक कार्य करताना निसर्ग आणि प्राणिमात्रांची काळजी घेण्याचे महत्त्वही या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

# जसखारच्या उपसरपंचपदी 'शिवसेनेचा' झेंडा; सौ. हेमलता ठाकूर विजयी

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

ालुक्यातील प्रसिद्ध आणि आर्थिकदृष्ट्या बळकट मानल्या जाणाऱ्या जसखार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवसेना–भाजप युतीच्या सौ. हेमलता भालचंद्र ठाकूर यांची निवड झाली आहे. सोमवारी दि. 9 जून 2025 झालेल्या बैठकीत हेमलता ठाकूर यांचा विजय निश्चित झाला. या विजयानंतर जसखार ग्रामपंचायतीत युतीचा दबदबा पुन्हा अधोरेखित झाला असून, या यशामागे उरणचे आमदार महेशशेठ बालदी आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अतुलशेठ भगत यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि पाठबळ लाभल्याचे स्पष्ट दिसून आले. या निवडणुकीचे 'किंगमेकर' म्हणून राकेश तांडेल आणि सचिन घरत यांनी निर्णायक भूमिका बजावली. त्यांचे कसब आणि नियोजन कौशल्य याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुकाप्रमुख दीपक ठाकूर, कामगार नेते सुरेश म्हात्रे, मनसे अध्यक्ष निशांत ठाकूर, माजी सरपंच नितीन पाटील, उपतालुकाप्रमुख अमित ठाकूर, आणि ग्रामपंचायत सदस्य सीमा ठाकूर, वैजयंती ठाकूर, धनवंती ठाकूर, दमयंती म्हात्रे आदी उपस्थित होते. युवा सामाजिक संस्था अध्यक्ष हर्षल ठाकूर, खजिनदार मयूर तांडेल, रितेश म्हात्रे, शाखाप्रमुख मेघनाथ ठाकूर, रवी ठाकूर, योगेश म्हात्रे, बिट्टू आणि अनेक ग्रामस्थांनी नव्या उपसरपंचास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला



## संत्रा फळ बाग शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी वर मात करण्यासाठी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहील.खा. (संजय भाऊ देशमुख.)

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशीम जिल्यातील ऑरेंज व्हिलेज म्हणून स्वतंत्र ओळख असणारे आदर्श ग्राम वनोजा ता. मंगरुळपीर येथे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांन सोबत संत्रा फळ बाग मधील शासकीय येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी मी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील त्या करिता आपण केंद्रीय स्थरावरील विशेष शिबीराचे आयोजन लवकरच करण्यात येईल असे आश्वाशन यावेळी लोकप्रिय खा संजय भाऊ देशमुख साहेब येवतमाळ लोकसभा मतदार संघ यांनी दिले. यावेळी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनसोबत विविध विषयावर दिलखुलास चर्चा करण्यात आली. या प्रसंगी संत्रा उत्पादक शेतकरी तथा तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे, महादेवराव राऊत, प्रा. सदानंद राऊत, मनोहरराव राऊत, विष्णुपंत राऊत मा जी. प. सदस्य शिवदास पाटील, डॉ सुनील राऊत सरपंच डॉ श्रीराम मुखमाले, संत्रा उत्पादक शेतकरीडॉ. भालचंद्र राऊत वामनराव पाटील, श्रीराम कुरवाडे, गणेश राऊत गुरुजी, गजानन राऊत गुरुजी, पुरषोत्तम राऊत,श्रीकांत राऊत एकनाथ पुंडकर, यशवंत राऊत,गौरव राऊत, सुजय राऊत,दिलीप राऊत, संजय वासुदेव राऊत, प्रकाश मुखमाले ज्ञानेश्वर मुखामले, विशाल इंगोले, गजानन इंगोले, अनिल पवार गोवर्धन पाटील मोहन उपाध्ये गुरुजी, नंदकिशोर गावंडे, सदानंद राऊत, गजानन राऊत देव, विठ्ठलराव राऊत, मुरलीधर राऊत, राजेश राऊत, पावन राऊत, सचिन राऊत आदी सर्व संत्रा व निंबू फळ बाग शेतकरी बहुसंख्य उपस्थित होते.



## विवाह खर्च टाळून गो शाळेला देणगी

**युवक आधारनिफाड**
**प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



आजकाल विवाह म्हटला कि लाखोंच्या घरात खर्च केला जातो त्या खर्चाला काही अर्थ नसतो कर्जाचा डोंगर उभे करून विवाह सोहळे पार पाडले जातात. त्याला अपवाद ठरले आहे गाजरे कुटुंब त्यांनी जगासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. निफाड तालुक्यातील बोकडदरे येथे असणाऱ्या भारत माता आश्रमाच्या गो शाळेला विवाहातील अतिरिक्त खर्चाला फाटा देत गाजरे दांपत्याने मदत देत गोमातेची वधूवरासह कुटुंबाने सेवा सेवा करत एक वेगळा आदर्श घालून दिला आहे डॉ.हेमंत अमृतराव गाजरे , विंचूर यांच्या मुलाच्या लग्न ता. ८/6/25 चि.वैभव चि सौ का. शुभांगी जळगाव नेऊर येथील शिंदे कुटुंबाच्या मुलीसोबत झाला त्यांनी इतर खर्च टाळून राहिलेली रक्कम भारत माता आश्रम बोकडदरे येथील गो शाळेला आपल्या नववधूंच्या हातचे गोशाळेला चारा साठी गोशाळेचे संस्थापक जणेश्वरानंदगिरी महाराज व संचालक गोरक्ष समाधान कापसे आणि संतोष आरोटे यांच्याकडे सुपूर्त केली सहकुटुंब येऊन गोशाळेला भेट दिली व गुळ व डाळीचा प्रसाद करून सर्व गोमातेला दिले विंचूर गोशाळा मध्ये आता 100 गाई वासरे आहेत कत्तल पासून वाचवलेली सर्व गाई वासर आहेत. यावेळी हेमंत गाजरे. सौ. मनीषा गाजरे. वैभव गाजरे. शुभांगी गाजरे. गौरव गाजरे. जय गाजरे सर्व गाजरे परिवार उपस्थिती राहुन सेवा केल्याने समाधान कापसे यांनी आभार मानले.

## विजेच्या तुटलेल्या केबलने घेतला तिघांचा बळी

**दैनिक युवक आधार**




**जालना** – एका दुर्दैवी घटनेत, शेतातील तुटलेल्या विजेच्या केबलच्या संपर्कात येऊन वडील आणि त्यांना मदत करण्यासाठी धावून गेलेल्या त्यांच्या दोन मुलांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यूमुखी पडलेले तिघे म्हणजे विनोद तुकाराम मस्के, त्यांची मुलगी श्रद्धा विनोद मस्के आणि मुलगा समर्थ विनोद मस्के, असे कळते. ही हृदयद्रावक घटना घडली तेव्हा मस्के कुटुंब शेतात काम करत होते. अचानकपणे विजेच्या तुटलेल्या केबलचा संपर्क विनोद मस्केंच्या शरीराला झाला. त्यांना वाचवण्यासाठी धावलेली त्यांची मुलगी श्रद्धा आणि मुलगा समर्थ देखील विजेच्या करंटच्या तडाख्यात सापडले आणि तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून घटनास्थळी भेट देऊन पुढील आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे.

## म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत'अंदाज मेरा मस्तानीच्या हिंदी बॉलीवुड गीतांचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**डोंबिवली प्रतिनिधि**
**-गुरुनाथ तिरपणकर**

एस् के ज्.म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट संस्थेच्या निर्मात्या व गायिका यांच्या संकल्पनेतून मुंबई,ठाणे जिल्हा अशा विविध शहरांमध्ये हिंदी-मराठी गीतांचे नृत्यमय सदाबहार कार्यक्रम आयोजित करत असतात. डोंबिवली शहरातही यापूर्वी विविध ठीकाणी म्युझिक मंत्राचे ऑर्केस्ट्रा झाले आहेत.त्याच अनुषंगाने नुकताच म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत"अंदाज मेरा मस्ताना"हा हिंदी बॉलीवुड गीतांचा सदाबहार कार्यक्रम सर्वेश हॉल,टिळक चौक,डोंबिवली(पुर्व)येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या उत्कंठावर्धक कार्यक्रमात निर्माती व गायिका शर्मिला केसरकर,मणी जोस,अर्शिता पुजारी,सोनाली वाळवे,रेखा हडकर,शशि मोहीते,प्रज्ञा तांबे,संजय पटवर्धन,अतुल खरे,कैलाश माहौर,श्री.पेंडसे,धनंजय बरबडे,मंगेश पारकर,इंद्रनिल,भरत शेडगे,नितीन



ठाकर,हर्षराज सुरवाडे या मात्तबर-प्रतिभावंत गायिकांच्या सुमधूर आवाजाने डोंबिवलीकर रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.काही हटके हिंदी गाण्यांवर नाचण्याचा ठेका धरला.व आनंद घेतला.याप्रसंगी स्पे.सपोर्टर ब्रदेश नायक,साऊंड एरेंजर किशोर,म्युझिक एरेंजर तुषार बने,को-ऑडिनेटर गणेश मांजरेकर,व्हिडीओग्राफर रविंद्र टिळेकर यांनी हा ऑर्केस्ट्रा सादरीकरणासाठी विशेष बहुमोल सहकार्य लाभले.या संगितमय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती कुंडु यांनी खुमासदार व उत्कृष्ट पध्दतीने केले.तसेच यावेळी ठाणे जिल्हा कॉंग्रेस महिला कमिटी अध्यक्षा तसेच महाराष्ट्र पोलिस बॉईज असोसिएशनच्या बदलापूर शहर अध्यक्षा साधाना ओव्हाळ,फॅशन डिझायनर,उद्योजिका,विविध पुरस्कार प्राप्त,विविध सामाजिक संस्थांनवर पदाधिकरी म्हणून कार्यरत असणा-या मनिषा सुर्वे,महाराष्ट्र सेवा संघ मुंबई अध्यक्ष,सचिव-वैश्यवाणी समाज मंडळ अंबरनाथ,सल्लागार-शक्ती सामाजिक संस्था ठाणे,कार्याध्यक्ष-स्वामी समर्थ प्रितिष्ठान बाळकृष्ण म्हसकर.तसेच सुर्वे हॉस्पिलिटी सोल्युशन व जेष्ठ समाजसेवक अरविंद सुर्वे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या सर्व प्रमुख पाहुण्यांचा निर्माती व गायिका शर्मिला केसरकर व त्यांच्या सहका-यांनी भेट वस्तु देऊन सत्कार केला. म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत"अंदाज मेरा मसाना"या ऑर्केस्ट्रातील गायक-गायिका यांनी आपल्या कंठस्वरांनी सुमधूर आवाजात हिंदी गाण्यांची मेजवानी डोंबिवलीकरांना दिली.त्यांनी शाबासकीची थाप,कौतुक व अभिनंदन केले.

## सन्मान द्या व सन्मान या सामाजिक उपक्रमांतर्गत पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त १० रक्तदात्यांनी केले रक्तदान

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**



भंडारा -प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस दैनिक माझ्या मराठवाडा विदर्भ विभागीय संपादक व जनता टाईम /जटा टीवी चे प्रतिनिधी संजीव भांबोरे यांच्या 9 जून 2025 ला वाढदिवसानिमित्त सन्मान द्या सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत 10 रक्तदात्यांनी रक्तदान केले . यात अनुक्रमे नितेश अंबादास कुंभलकर, निलेश सच्चिदानंद लेंडारे, अमित रवींद्र शिवणकर, संदीप अनिल राऊत ,वैभव नेमीचंद लेंडारे, लोकनाथ दादाजी रायपुरे, अक्षय विठ्ठल गणवीर,विलास बेनीराम बांडेबुचे, निखिलेश प्रकाश कांबळे, राहुल घनश्याम गणवीर यांचा समावेश आहे.रक्त डोनेट करण्याकरिता भंडारा येथून समर्पण ब्लड बँक चे सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. या ब्लड डोनेट शिबिराला दैनिक माझा मराठवाडा चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,माजी खासदार खुशाल बोपचे ,जनता टाईम जटा ,टीवी चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे ,सविधान संघर्ष समितीचे भंडारा जिल्हाध्यक्ष रोशन जांभुळकर ,प्राध्यापक राजेश नंदपुरे, साहित्यिक अमृत बनसोड, शांतीवन बुद्धविहाराचे संचालक जीवन बोधी बौद्ध यांनी भेट दिली.

## भारतीय मोटरस्पोर्ट इतिहासातील ऐतिहासिक क्षण, प्रतिष्ठित सर्किटवर विजय मिळवणारा कुश पहिला भारतीय

### मोनॅको फॉर्म्युला 2 स्पर्धेत कुश मैनी ला ऐतिहासिक विजय प्राप्त

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**

भारतातील आघाडीच्या वैविध्यपूर्ण समूहांपैकी एक असलेल्या रेमंड ग्रुपने, मोनॅको ग्रांपीमधील कुश मैनीचा फॉर्म्युला 2 मधील विजय साजरा करण्यासाठी मुंबईतील जेके हाऊस येथे एक विशेष प्रेस कॉन्फरेन्स आयोजित केली होती. या खेळातील भारताचा हा पहिलाच विजय होता. या कार्यक्रमाचे आयोजन रेमंडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. गौतम सिंघानिया यांनी केले होते. सिंघानिया स्वतः या खेळाचे चाहते आहेत तसेच फेरारी चॅलेंज सिरीज ईयूमध्ये त्यांनी पहिल्या तिघांत स्थान मिळवले आहे. कुशचे वडील आणि रेमंड ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी श्री. गौतम मैनी यांच्या उपस्थितीत श्री. सिंघानिया यांनी कुशचा सत्कार केला. श्री.गौतम हरी सिंघानिया यांनी सुरुवातीच्या काळात कुश मैनीला बरेच पाठबळ दिले. तसेच त्याचे मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मोटरस्पोर्ट्स आणि स्पर्धात्मक रेसिंगमधील सिंघानिया यांचा प्रदीर्घ अनुभव आणि भारतासाठी एफआयए प्रतिनिधी म्हणून काम करणे याचे कुश यांच्या सुरुवातीच्या यशात महत्त्वाचे योगदान आहे. श्री.गौतम हरी सिंघानिया म्हणाले की,"मोनॅको येथील विजयानंतर अभिमानाने तिरंगा फडकत असताना राष्ट्रगीत ऐकणे हा रेमंडसाठी आणि वैयक्तिकरित्या माझ्यासाठीही अभिमानाचा क्षण होता. F2 मध्ये भारतीय प्रतिनिधित्वाचा अनोखा क्षण साजरा करताना आम्हाला आनंद होत आहे. उत्कृष्टता, शिस्त आणि लवचिकता ही मूलभूत भारतीय मूल्ये रुजलेला कुश मैनी हा भारताचे प्रतिनिधित्व करतो. तो भारताचे आशास्थान आहे.



आपले शताब्दी वर्ष साजरे करत असताना, कुशचे यश हे भारताच्या पुढील पिढीतील जागतिक कामगिरी करणाऱ्यांना प्रेरणा आणि सक्षम करण्याच्या रेमंडच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे." मोनॅको येथे कुश मैनीचा फॉर्म्युला 2 मधील विजय हा भारतीय मोटरस्पोर्ट इतिहासातील एक ऐतिहासिक क्षण आहे. या प्रतिष्ठित सर्किटवर विजय मिळवणारा पहिला भारतीय म्हणून, कुशने 2024 च्या हंगामात पोल पोझिशन आणि पहिल्या तिघांत येत धमाकेदार कामगिरी केली. आता अल्पाइन F1 संघासाठी तो राखीव ड्रायव्हर म्हणून काम करत आहे. जागतिक रेसिंग स्टेजवर तो भारताचे स्थान मजबूत करतो आहे. या प्रसंगी कुश मैनी म्हणाले,"श्री. सिंघानिया आणि वारसा, नेतृत्व आणि उत्कृष्टतेचे प्रतीक असलेल्या रेमंड ग्रुपचे पाठबळ मिळणे ही खरोखरच अत्यंत सन्मानाची गोष्ट आहे. श्री. सिंघानिया यांची मोटरस्पोर्ट्सची सखोल समज आणि त्यांचा उत्साह सर्वांना प्रेरणादायी ठरतो. 100 वे वर्ष साजरे करणाऱ्या आणि प्रतिभा तसेच जागतिक पातळीवर यशस्वी ठरलेल्या राष्ट्रीय ब्रँडशी जोडले जाणे खरोखरच विशेष आहे."

कुश यांचे यश साजरे करण्याचा हा कार्यक्रम केवळ असाधारण क्रीडा कामगिरीला मान्यता देत नाही. तर पुढील शतकात विविध क्षेत्रात परिणामकारक आणि नावीन्यपूर्ण कामगिरी करण्याची इच्छा बाळगणाऱ्या भारतीय उत्कृष्टतेला पाठिंबा देण्याच्या रेमंडच्या अढळ वचनबद्धतेला देखील अधोरेखित करतो.

## आयुष्य (जीवन) हा चित्रपट पुन्हा होणे नाही!

**दैनिक युवक आधार-** खरंतर १९५०-७० च्या दशकातील काबाडकष्ट करणारी पिढी आता संपुष्टात होत चालली आहे. ग्रामीण भागात पुरुषवर्ग मंदिरा शेजारी सफेद लेंगा, सफेद कुर्ता व डोक्यावर टोपी अशी पारंपरिक वेशभूषा परिधान केलेली पिढी रोज सकाळी देवदर्शन करून बसलेली दिसते. याशिवाय गावाला शोभा नाही.महिलांमध्ये पहाटे ५ वाजल्यापासून स्वयंपाक, देवपूजा करून डोक्यावर पदर व कुंक लावून , मुलांना शाळेत घालवून संस्काराची, नम्रतेची, आदराची पिढी घडवली. शेती व व्यवसायाकडे पाऊल उचलले जाते व सायंकाळी काबाड कष्ट करून आल्यावर स्वयंपाक करून सुखाची झोप लागते. असा दिनक्रम ग्रामीण भागात चालतो. याच पिढीने देशातील स्वातंत्र्यानंतरचा काळ व संघर्ष बघितला. महापूर, वादळे, भूकंप ,दुष्काळ व देशातील १९७१ मधील भारत पाकिस्तान युद्ध बघितले आहे. पाण्यासाठी विहीर खोदून पिण्यासाठी व शेतीसाठी पाण्याचा संघर्ष केला व जगाचा पोशिंदा बनला. या उलट शहरी भागामध्ये याच दशकातील पिढी सकाळी व्यायाम करून चार भिंतीच्या आत मध्ये टीव्हीवर जगात चाललेल्या घडामोडी व करमणूक कार्यक्रम पाहते. मोबाईल मुले मुलांना व्यसन निर्माण झाले आहे तर काही ठिकाणी शिक्षणसाठी फायदा होत आहे.युवा पिढी व्यसनाधीन बनत चालली आहे त्यामुळे आपल्या ध्येयापासून दूर भटकत चालली आहे. भविष्य अंधारात चालले आहे.व्यसनापासून दूर राहिले पाहिजे तरच आपण आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करू शकतो. आता १९५०-१९७० च्या दशकातील पिढीने घडवलेली संस्कारी पिढी उद्योग व नोकरीसाठी बाहेरगावी आली. आपला नीटनेटका संसार करत गावाकडच्या आपल्या आई-वडिलांना संभाळतात तर काही मंडळी संस्कारीक पिढी सध्याच्या युगात आई-वडिलांना अनाथ आश्रम व गावाकडे पाठ फिरवली आहे. आता त्यांना आपल्या आई-वडिलांनी काबाडकष्ट करून एवढ्या उंचीवर नेऊन ठेवले याची जाणीव विसरले आहेत. आपल्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सर्व विधीवर लाखो रुपये खर्च करतात मग पण जिवंत असताना विचारपूस का केली जात नाही ? याचीच खंत वाटते. मग आई वडिलांनी आपल्या पोटच्या गोळ्याला संस्कार द्यायला कमी पडले का? आपली शेतीवाडी विकून मुलाला शिक्षण दिले याची चूक झाली? असे अनेक प्रश्न मनात येतात.




नियतीच्या पाड्या प्रमाणे *जैसे कर्म तैसे फळ* भोगावे लागते.अजूनही वेळ गेलेली नाही आपल्या आई-वडिलांना, आपल्या जवळच्या नातेवाईकांना,मित्रपरिवार संभाळा व जिवंतपणे विचारा यातूनच माणुसकीचे दर्शन होहिल हे नक्की!

**श्री अमोल पाटील**
**उपसंपादक-शिवधर्म न्युज पेपर**
**रायगड जिल्हा उपाध्यक्ष-राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ**
**मो.-८१६९१७५०३८**

## 'वटपौर्णिमेचा नवा संकल्प,जागोजागी लावु वटवृक्ष"कार्यक्रमाचे आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**. रणजीत सिंह ठाकुर**

...कार्यक्रमाच्या शिर्षकामध्ये असणाऱ्या संकल्प शब्दाचा सारगर्भित अर्थ म्हणजे विधायक कामाच्या माध्यमाद्वारे ध्येयाकडे वाटचाल करत पुर्णतः समाधान मिळविणे होय.पुरातन काळापासून तर अलीकडीच्या 1970 पर्यंत लोकसंख्या मर्यादित असल्याकारणाने जमीनीचा बराच भुभाग मोकळा होता आणि त्या ठिकाणी विशालकाय छायादार वटवृक्ष तटस्थ ऊभी होती.पण वाढत्या लोकसंख्येच्या विस्फोटामुळे असंख्य वटवृक्षांची कत्तल झाली,हे नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही.असे मत वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी श्री क्षेत्र पिंगलाक्षी देवी संस्थान रिसोड येथे वटपौर्णिमा निमित्त




सुवासिनींच्या हस्ते वटवृक्ष रोपणाच्या वेळी व्यक्त केले.कार्यक्रमाकरिता डॉ.निखील सरकटे बालरोग तज्ञ जी.एम.सी.हॉस्पिटल हैद्राबाद,रमेश कदम वनरक्षक सामाजिक वनिकरण विभाग रिसोड,गजानन कोरडे पोलीस पाटील रिसोड,शंतनु मोरे गणित प्राध्यापक,संतोष वाघमारे संस्थान संचालक ईत्यादि प्रामुख्याने उपस्थित होते.मंदीर व तलाव परिसरात वटवृक्षासोबतचं भरपुर वैरण देणार्या 500 सुबाभळीच्या रोपांची सुध्दा लागवड करण्यात आली.कार्यक्रमाचे महत्व पटवून देतांना मुलंगे म्हणाले कि,वटपौर्णिमेचे पर्व साजरे करणे अर्थात धार्मिकता तसेच पूर्वापार चालत आलेल्या सुसंस्कारांचे जतन करणे होय.वटवृक्ष रोपणाचा संकल्प करणे म्हणजे केवळ पर्यावरणाचा होत असलेला र्हास थांबविणे नव्हे तर हा संकल्प आहे पशु-पक्ष्यांना निवारा उपलब्ध करून देण्याचा,हा संकल्प आहे नवरात्री उत्सवा दरम्यान विक्रि करून उदरनिर्वाह करणार्या किरकोळ व्यापार्याला छायादार आश्रय मिळवुन देण्याचा किंवा असं हि म्हणा कि,हा संकल्प आहे वडाच्या लांबसडक व मजबुत पारंब्यांना लोंबकळत झोके घेणार्या अजाण बालकाच्या चेहर्यावर हसु खुलवण्याचा!जर एका वटवृक्षाच्या रोपणाने एवढे विधायक कार्य संपन्न होत असतील तर प्रत्येक वर्षी पाच ते सात सुवासिनींनी एकत्रितपणे वटवृक्षाचे रोपणं करून त्याची पुजा करणे अपेक्षित आहे.उपस्थित सुवासिनींनी यापुढे वटपौर्णिमानिमित्त वटवृक्ष रोपणाचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता सिमा मुलंगे,सारिका वाघमारे,सोनाली वाघमारे,वेदिका थोरात,ऋतुजा वाघमारे,मेघा गोटे,शिल्पा आकमार,दिनकर गोटे, गुणवंत थोरात,राहूल भुतेकर इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले.

# 'राजकारण्यांना सत्कार करण्याची इतकी घाई का.!"

**दैनिक युवक आधार-** आय. पी.एल. च्या स्पर्धेमध्ये रॉयल चॅलेंज बेंगळुरू संघाने सतत 18 वर्ष झुंज दिल्यानंतर, त्यांना विजेतेपद मिळाले. त्याचा आनंद सर्वांनाच झाला. मी सर्वांनाच अशा अर्थाने म्हणतो की, आताच्या काळात, संघ कर्णधार विराट कोहली हा देशामध्ये सर्वांत लोकप्रिय खेळाडू आहे. त्याच्या चाहत्यांची लक्षणीय संख्या भारतासह जगभर आहे. म्हणुन त्याच्या संघाने जेतेपद मिळविले आणि देशभरात जल्लोष झाला. ते सहाजिक आहे. परंतु हा संघ कर्नाटक राज्याची राजधानी असलेल्या "बंगळुरु" नावाशी निगडित असल्यामुळे, त्या राज्यात इतर ठिकाणांपेक्षा जास्त जल्लोष झाला. मंगळवारी रात्री 11.30 वाजता हा सामना संपून कोहलीचा संघ विजेता म्हणुन घोषित झाला. तो विजयी सोहोळा साजरा करण्यासाठी, काही तासांच्या अवधीत कर्नाटक सरकारने बंगळुरू येथे चेन्नास्वामी स्टेडियममध्ये खेळाडूंचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित केला. त्याला अलोट जनसमुदाय लोटणार. तिथे प्रचंड गर्दी होणार. हे कुणीही सांगू शकले असते. त्या गर्दीला काबूत ठेवणे. ही जिकिरीची गोष्ट होती. त्यासाठी आवश्यक त्या नियोजनासाठी अवधी मिळणे आवश्यक होते. परंतु घाईघाईने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या गर्दीला आटोक्यात ठेवण्यासाठी, आवश्यक ते नियोजन करण्यासाठी वेळ न मिळाल्यामुळे नियोजनात त्रुटी राहिल्या. म्हणुन त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. तिथे अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक लोक जमा झाले. त्यामुळे प्रचंड रेटारेटी झाली. त्यात जीव गुदमरून 11 जणांचा बळी गेला. हा आकडा वाढू शकतो. तसेच 50 पेक्षा अधिक लोक मृत्यूशी झुंज देत औषधोपचार घेण्यासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल झाले आहेत. हा झाला घटनाक्रम. आता प्रश्न असा पडतो की, संबंधित संघाचा कर्नाटक राज्य सरकारशी काय संबंध आहे? तो संघ खाजगी फ्रॅन्चायझीच्या मालकीचा आहे. हा समारंभ मालकांनी आयोजित करणे अपेक्षित होते. मग सिद्धरामय्या सरकारला इतकी घाई का झाली? इतक्या कमी वेळेत, नियोजनशुन्य समारंभ आयोजित करण्याची गरज होती का ? त्यांनी हा आटापिटा कशासाठी केला? या अगोदर देशात अशाप्रकारचे सोहळे साजरे झाले नाहीत का? त्याची खूप उदाहरणे देता येतील. 1971 साली अजित वाडेकर ह्यांच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडिज संघाचा पराभव करून, परतलेल्या विजयी भारतीय संघाची मुंबई विमानतळापासून खूप लांब पल्ल्याची आणि प्रचंड गर्दीची मिरवणूक कोण विसरेल? त्यांचा सत्कार समारंभ ही तितकाच दिमाखदार झाला. तेव्हापासुन 2024 मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली वर्ल्ड कप जिंकल्यानंतर मरीन ड्राईव्ह येथे निघालेली प्रचंड मिरवणूक, सत्कार समारंभ अशा घटनांची पुष्कळ उदाहरणे देता येतील. परंतु आतापर्यंत कधीही आणि कुठेही अशा प्रकारची मन सुन्न करणारी घटना घडली नाही. एक गोष्ट स्पष्ट आहे की, जिथे क्रिकेटर आणि क्रिकेट, तिथे हमखास गर्दी. हे समीकरण माहीत असून देखील इतक्या घिसाडघाईने



हा कार्यक्रम का आयोजित केला? ह्या आनंदाच्या क्षणात, आपल्या आवडत्या खेळाडू सह आनंद व्यक्त करण्यासाठी प्रचंड गर्दीची खात्री असताना, त्या गर्दीचे योग्य नियोजन करण्यास पोलीस दलाला आवश्यक अवधी का दिला नाही? ह्या घटनेला जबाबदार कोण? त्याची नैतिक जबाबदारी आतापर्यंत कुणी का स्विकारली नाही? विशेष म्हणजे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या ह्यांनी तर सांगून टाकले की, स्टेडियमची क्षमता 35, 000 इतकी असतांना, तिथे अडीच, तीन लाख लोक जमा झाल्यामुळे हा दुर्दैवी प्रकार घडला. म्हणजे बेसुमार गर्दी होणार हे त्यांना माहीत नव्हते का? हा सत्कार समारंभ इतक्या घाईघाईने आणि नियोजनशून्य पद्धतीने आयोजित करण्यास एकच कारण आहे ते म्हणजे राजकारण्यांना संधीचा अचूक फायदा करून घेण्याची अतिशय घाई असते. "पळा, पळा, कोण पुढे पळे तो" ह्या उक्ती नुसार सर्वांत आधी सत्कार समारंभाचे आयोजन केल्याचे श्रेय घेण्यासाठी ही घाई केली गेली. त्याची शेखी पुढील काळात मिरवण्यासाठी हे बळी दिले असा माझा स्पष्ट आरोप आहे. कारण क्रिकेट हा खेळ आणि तो खेळणारे क्रिकेटपटू हे कायम भारतीयांच्या गळ्यातले ताईत आहेत. भारतियांना क्रिकेटची फक्त आवड नसून, त्याचे वेड आहे. भले ही एखाद्या व्यक्तीला, त्या खेळातील ओ की ठो कळत नसेल, पण तो तन्मयतेने दूरदर्शनवर क्रिकेटचे सामने पाहतो. त्यात समरस होऊन आनंदी होतो. भारतीय संघ पराभूत झाल्यास, स्वतः पराभूत झाल्याचे दुःख होते. किंवा एखाद्याची ऐपत असेल तर सामन्याचे तिकीट काढून, प्रत्यक्ष सामना बघण्याचा आनंद घेतो. स्टेडियममध्ये असे अज्ञानी लोक खूप भेटतील. पण खेळ प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो. कर्नाटक सरकारने नेमके हेरले. त्याचे श्रेय घेण्यासाठी घिसाडघाईने हा कार्यक्रम आयोजित केला. ह्याबाबत पोलीस दलाला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. कारण इतक्या मोठ्या समारंभाचे, योग्य नियोजन करण्यासाठी अवधी आवश्यक असतो. तो पोलीस प्रशासनाला मिळाला नाही. ह्याला जबाबदार फक्त कर्नाटक राज्य सरकार आहे. आता त्यांनी म्हणे चौकशी समिती नेमली आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, आपल्या देशात आतापर्यंत किती चौकशा समित्या नेमल्या? त्याचे फलित काय निघाले? ह्या समित्यांची चौकशी करण्यासाठी, एक नवीन चौकशी समिती नेमून, त्यातून काय निष्पन्न झाले? ह्यांची चौकशी करून अहवाल सादर करण्याची मागणी करायला पाहिजे.असे म्हंटले तर तर तो विनोद होणार नाही. आजपर्यंत अगणित चौकशी समित्या नेमण्यात आल्या आहेत.

**शेवटी काय! तर जाणाऱ्यांचा** जीव गेला आणि जे जखमी होऊन उपचार घेताहेत, त्यांच्या नशिबात पुढे काय लिहून ठेवले आहे? हे आताच सांगणे कठीण आहे. किमान पुढच्या काळात तरी राजकारण्यांनी अशा कार्यक्रमाचे आयोजन करू नये. ते काम संघाच्या संबंधित पदाधिकाऱ्यांचे आहे किंवा आय. पी. एल. सारख्या फ्रॅन्चायझी सारख्या मालकांचे आहे. त्यांना संधी दिलीत, तर ते नियोजन पूर्वक कार्यक्रमाची आखणी करून, त्याची योग्य ती अंमलबजावणी करून, कार्यक्रमाला गालबोट न लागता, यशस्वी करतील. त्यामुळे असे प्रसंग निश्चितपणे टाळता येतील. संबंधित क्रिकेट संघटनांस मी फार फार तर विनंती करू शकतो की, अशा कार्यक्रमांना राजकिय व्यक्तींना सन्मानाने उपस्थित राहण्यास विनंती करा.

**अरुण निकम.**

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# शिवसेना ( उबाठा ) पक्षाच्या विभागप्रमुखपदी अमोल गोवारी तर शाखा प्रमुखपदी मयुरेश पाटील यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या पनवेल प्रभाग क्रमांक २० च्या विभागप्रमुखपदी अमोल गोवारी तर प्रभाग १९ च्या शाखा प्रमुखपदी मयुरेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे . पनवेल शहर शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमात शिवसेना उपनेते सुरेंद्रनाथ माने,शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर ,जिल्हाप्रमुख शिरीष घरत ,उप जिल्हाप्रमुख रामदास पाटील ,युवासेना रायगड जिल्हा प्रमुख पराग मोहिते, युवासेना महानगर प्रमुख अवचित राऊत, शहर प्रमुख प्रवीण जाधव, शिवसेना शहर संघटिका अर्चना कुळकर्णी, उपशहर संघटक नंदकुमार घरत, मा. नगरसेवक अच्युत मनोरे, जेष्ठ शिवसैनिक जयवंत परदेशी,रणजित परदेशीं , प्रविण डावलेकर, वैभव मढवी ,जिवन मढवी,शाखा प्रमुख अलकेश जाधव, उपशाखा प्रमुख सुधीर मिसाळ, सर्वेश पवार, सनी मिसाळ आणि शिवसैनिक उपस्थित होते.



# काशी स्पोर्ट्स सेंटरचे उद्घाटन अनेक मान्यवरांच्या उपस्थित संपन्न ; खेळाडूंसाठी खेळपर्वणी..

## एक विक्रम.. यशवंत होण्याचा , कला,क्रिडा,संस्कृती जोपण्याचा, शहराच्या विकासाच्या वाटचालीचा ...

## के.एस.सेंटरचे उद्घाटन डीवायएसपी विक्रम कदम यांच्या हस्ते ..

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

खोपोली शहराच्या वैभवी विकासात अनेक वर्षे महत्वपूर्ण योगदान देणारे दानशूर साबळे परिवार व त्यांच्या लोकसेवेचा वारसा पुढे चालवणारे त्यांचे नातू अभ्यासू युवा नेतृत्व विक्रमशेठ साबळे यांच्या संकल्पनेतून काशी व्यवस्थापन सर्वेसर्वा यशवंतशेठ साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या मातोश्री यांच्या नावाने शांतीनगर महाराजा मंगल कार्यालयाच्या मागील ठिकाणी काशी मल्टी गेम्स इंडोर स्पोर्ट्स एरिना हे अत्याआधुनिक भव्य दिव्य सेंटर मोठ्या दिमाखात उभारण्यात आले. के. एस .सी. म्हणजे काशी स्पोर्ट्स सेंटर तर्फे शहरात प्रथमच टर्फ क्रिकेट , फुटबॉल, कॅरम ,चेस, फूसीबॉल , स्नोकर असे विविध खेळ उपलब्ध आहेत .प्रशिक्षकांच्या निगराणीखाली खोपोलीकरांच्या सेवेत इच्छुक खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हे खेळ सेंटर नियोजित करण्यात आले. सदर उद्घाटन १० जून रोजी सायंकाळी ०५:३० च्या शुभमुहूर्तावर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत डीवायएसपी विक्रम कदम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले . या प्रेरणादायी उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन अनिरुद्ध पाटील, संदीप वांजळे , मुख्याधिकारी पंकज पाटील ,खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम तसेच इतर संस्था सदस्य, विविध खेळ क्षेत्रातील जागतिक, राज्यस्तरीय तसेच स्थानिक स्तरावरील अनेक खेळ प्रशिक्षक तज्ञ मार्गदर्शक , खेळाडू वर्गाच्या उपस्थितीत या स्पोर्ट्स सेंटरचा उद्घाटन लोकार्पण सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. यावेळी खेळ क्षेत्रातील तज्ञ प्रकाश वाघ, शरद कदम, राजा बाबूं सगळगीळे, पद्माकर गायकवाड , अमित विचारे , डॉ. सुनील पाटील ,कुलदीप शेंडे , मोहन औसरमल, गुरुनाथ साठेलकर, तसेच




खेळ क्षेत्रातील असंख्य चाहते राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी काशी होम्स व्यवस्थापनेच्या वतीने सर्व पाहुण्यांचे स्वागत, सन्मान करण्यात आले. खेळ क्षेत्रातील प्रशिक्षक तसेच विविध स्तरावर नामलौकिक मिळवणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले . सर्व सामान्य नागरिकांना सहजपणे सोयी सुविधा उपलब्ध झाल्याने खोपोलीकारांनी साबळे परिवाराच्या स्पोर्ट्स सेंटरच्या संकल्पनेचे विशेष कौतुक केले. युवा उद्योजक दूरदृष्टी ठेवणारे विक्रमशेठ साबळे यांनी विविध स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त केले व जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील असलेले गुण त्यांच्या मधील लोकप्रतिनिधी कसा असावा हे वेळोवेळी सिद्ध करत असल्याचे सांगत माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी व्यासपीठाच्या वतीने शुभेच्छा दिल्या .मुख्याधिकारी नगरपरिषद पंकज पाटील यांनी सदर उपक्रमाचे कौतुक करत भविष्यात पालिकास्तरावर अश्या संकल्पनेतुंन जी काही मदत उपलब्ध करता येईल आम्ही ती करू असे आश्वासित केले .साबळे परिवाराने काशी होम प्रायव्हेट लिमिटेड, काशी हॉस्पिटॉलिटी,काशी पतसंस्था अश्या महत्वपूर्ण सेवेत या आधी यशस्वी वाटचाल केल्याने सदैव खोपोलीकरांचा विश्वास संपादित केला. यावेळी कै. लक्ष्मण शेठ साबळे यांच्या महत्वपूर्ण कार्याचे स्मरण करून परत एकदा पालिकेच्या नगराध्यक्ष पदी साबळे यांचीच वर्णी लागावी अशी काही इच्छाहि खोपोलीकरां मध्ये ऐकायला मिळाली. खेळाडूंनी स्पोर्ट सेंटर मध्ये सराव व प्रशिक्षणासाठी स्पोर्ट्स सेंटरच्या अटी ,शर्ती नियमानुसार प्रवेश प्रक्रिया करून विशेष सवलतींचा लाभ घ्यावा .साबळे मित्र परिवार, काशी व्यवस्थापन खोपोलीकरांच्या सेवेमध्ये सदैव आपल्या सर्वांच्या सहभागाने सक्रिय असेल असा विश्वास यावेळी युवा नेतृत्व विक्रम साबळे यांनी व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

# वारंवार अतिक्रमण कायम ठेवणाऱ्या हातगाड्यांवर पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाची तोडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )** : पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार सार्वजनिक रस्ता अडवून नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या कळंबोली परिसरातील हातगाड्यांवरती अतिक्रमण विरोधी पथकाच्यावतीने तोडक कारवाई राबविण्यात आली. वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण कायम ठेवणाऱ्या 5 हातगाड्यांवर प्रभाग अधिकारी श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती 'ब' अंतर्गत या तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी प्रभाग समिती 'ब' चे प्रभारी अधीक्षक मनोज चव्हाण, अतिक्रमण विरोधी पथक व प्रभागाचे संबंधित कर्मचारी उपस्थित होते.सिटी हॉस्पिटल, कळंबोली परिसरातील यापूर्वी तोडण्यात आलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्या पुन्हा त्याच ठिकाणी उभारल्याचे निदर्शनास आले होते. या झोपड्यांवर तोडक कारवाई ऐवजी झोपडपट्टी धारकांना स्वतः झोपड्या हटविण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, झोपडपट्टी धारकांनी स्वतःचे साहित्य व झोपड्या अतिक्रमित जागेवरून हटवून महापालिकेस सहकार्य केले. या कारवाई दरम्यान सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती ब, अतिक्रमण विरोधी कारवाई पथक तसेच प्रभाग कर्मचारी उपस्थित होते. कोणतीही तोडक कारवाई न करता ही कार्यवाही यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.



# ट्रकला लागली आग, ट्रकचा पुढील भाग जळाला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : करंजाडे रेल्वे फाटकाच्या वरील हायवेवर ट्रकला दहा जून रोजी रात्रीच्या सुमारास आग लागली. या आगीत ट्रकचा पुढील भाग जळाला आहे. अग्निशामक दलाने ही आग विझवली. 10 जून रोजी रात्री सव्वा नऊ ते साडेनऊच्या दरम्यान ट्रक क्रमांक एम एच 43 वाय 7331 या वाहनाला आग लागली. या आगीची माहिती पनवेल अग्निशामक दलाला देण्यात आली. घटनास्थळी अग्निशामक दल पोहोचले. या आगीवर होजरील होजच्या सहाय्याने पाणी मारून ही आग विझवण्यात आली. यावेळी या आगीत ट्रकचा पुढील भाग जळून खाक झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही मात्र ट्रकचे मोठ्या नुकसान झाले आहे.



# ग्रामीण नाट्य कलाकारांमध्ये नाट्यगुण आहेत !

## ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांचे प्रतिपादन

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

ग्रामीण नाट्य कलाकारांमध्ये नाट्यगुण आहेत, ग्रामीण रंगभूमी ही समृद्ध रंगभूमी असून ती खऱ्या अर्थाने नटराजाची भूमी आहे. असे प्रतिपादन प्रख्यात ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांनी पनवेल येथे काढले. उरण तालुक्यातील गोवठणे येथील जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शहरी भागातील नाट्य रसिकांच्या मागणीनुसार शिव आलिंगन या शिवचरित्रावर आधारित, ऐतिहासिक नाट्यप्रयोगाचे आयोजन रविवारी8 जून रोजी, सकाळी 11:00 वाजता करण्यात आले होते. यावेळी नाट्यप्रयोगाचे उद्घाटन ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून, करण्यात आले. त्यावेळी ते उद्घाटनप्रसंगी भाषणात बोलत होते.याप्रसंगी व्यासपीठावर नाटककार हसुराम पाटील, रंगनायक मधुकर पाटील, रंगनायक रवींद्र पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे, रंगनायक दत्तात्रेय घरत, सुरेश म्हात्रे, श्रीधर मोकल, लक्ष्मीकांत म्हात्रे, रामनाथ म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. यापुढे पांडुरंग पाटील यांनी साक्षात नटराजाच्या पाऊल खुणा उमटाव्यात इतका सुरेख व देखणा नाट्यप्रयोग



वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर होत असताना, मनाला एक वेगळाच आनंद मिळत असल्याच्या भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. या नाटकाचे लेखन शारदाकुमार शिर्सेकर यांचे तर प्रख्यात ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांनी आपले कसब वापरून नाटकातील पात्रे अक्षरशः सजीव केली आहेत. राजू म्हात्रे यांचे प्रासंगिक संगीत तर उदय तांगडी (ठाणे) यांची उठावदार रंगभूषा, अमृत म्हात्रे यांची वेशभूषा तर जितेंद्र म्हात्रे यांचे पार्श्वगायन होते. नाटकातील, जिजामाता व बडी बेगम सौ. हेमांगी शैलेंद्र म्हात्रे, छत्रपती शिवाजी महाराज नरेंद्र वर्तक, अफजलखान कृष्णकांत म्हात्रे, नेताजी शैलेंद्र म्हात्रे, सय्यद बंडा निलेश म्हात्रे, पंताजी अशोक म्हात्रे, कृष्णाजीभास्कर प्रेम पाटील, कान्होजी जगन्नाथ वर्तक, खवासखान रूपम म्हात्रे, बहिर्जी आकाश पाटील, बाजी घोरपडे रोहन म्हात्रे, भावन्या विवेक वर्तक, प्रतापराव मोरे महेश पाटील, जीवा महाले अतिश वर्तक, संभाजी कावजी प्रदीप वर्तक, बिजली सौ. शितल अशोक म्हात्रे, मावळे संदेश म्हात्रे, साई म्हात्रे अरब सैन्य क्रिश म्हात्रे, सुरेश वर्तक व आर्य म्हात्रे आदी कलाकारांच्या नाटकातील प्रसंग व सादरीकरणातून अभिनयाची जुगलबंदी पाहायला मिळाली. त्यामुळे नाटकाची जादू जरा वेगळीच राहिल्याची उत्स्फूर्त प्रतिक्रिया रसिकांमधून ऐकावयास मिळत होती.

# 7 जुलै रोजी देहराडून, उताराखंड येथे होणाऱ्या ऑल इंडिया ओपन शूटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**




28 वी कॅप्टन एसजे एझेकिएल (एनआर) कॉम्पिटिशन 6 जून ते 9 जून दरम्यान महाराष्ट्र रायफल संघटना वरळी, मुंबई येथे संपन्न झाली. या स्पर्धेत सिद्धांत रायफल आणि पिस्टल शूटिंग क्लब रायगडच्या 31 नेमबाजानी रायगड जिल्ह्या तर्फे सर्वाधिक प्रतिनिधित्व केले होते. 25 मिटर स्टॅंडर्ड तसेच एमएएफसी स्पोर्ट्स पिस्टल, 50 मिटर फ्री पिस्टल मध्ये वेदांत किसन खारके (नेरे पनवेल), 50 मिटर रायफल प्रोन पुरुष मध्ये गौरव ठाकूर (चिरनेर उरण) कान्स्य पदक, 50 मिटर रायफल प्रोन जुनिअर मेनमध्ये कुणाल पाटील (जासई उरण) सिल्वर मेडल, दिग्विजय चौगुले, पार्थ, तोडकर, 50 मिटर रायफल जु. वूमन मध्ये वैभवी बिष्ट हिस सिल्वर, कार्तिकी देऊळेकर, व वरा देऊळेकर 50 मिटर प्रोन रायफल मेनमध्ये नंदकुमार माने ठाणे अंमलदार बेलापूर, 50 मिटर रायफल मास्टर मेन मध्ये राजू मुंबईकर (वेश्वी उरण), 50 मिटर फ्री पिस्टल शुभम पुसलकर आणि दुर्गा जाधव, 50 मिटर ओपन साईट रायफलमध्ये करण बेहेरे सिल्वर व मयुरेश सावंतला कान्स्य, सागर वैगनकर तसेच शॉट गन ट्रॅप मध्ये अवनी कोळी,(दिघोडे उरण) सिल्वर मेडल, वरा देऊळेकर,व कार्तिकी देऊळेकर डबल ट्रॅप पटकावले. ह्या सर्वांची 7 जुलै रोजी देहरादून, उत्तराखंड येथे होणाऱ्या इंडिया ओपन शूटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली. गौरव ठाकूर व कुणाल पाटील याना महाराष्ट्र रायफल संघटनेच्या सेक्रेटरी शिला कानूगो व अध्यक्ष अशोक पंडित ह्यांच्या हस्ते पदक देवून सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल त्यांचे क्लबचे सेक्रेटरी रायगडभूषण राष्ट्रीय नेमबाज किसन खारके, प्रशिक्षक अलंकार कोळी, राल्स्टन कोयलो, क्लबचे सदस्य अजिंक्य चौधरी, समाधान घोपरकर, अविनाश भगत, प्रकाश दिसले, सुनील मढवी, समीर अंबवणे, नंदकुमार मुंबईकर तसेच मित्र परिवार यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेबद्दल शुभेच्छा दिल्या.

# तनेएराने जाहीर केली पहिल्यांदाच साडीवर ४० टक्के सवलत

## योग्य, आकर्षक किमतीत विविध प्रकारच्या पारंपरिक पोशाखांची व्यापक श्रेणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

टाटाचा ब्रॅंड असलेल्या तनेएराने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे तीस टक्के वाढ नोंदवली असून आर्थिक वर्ष २६ च्या सुरुवातीलाही लग्नसराईच्या मजबूत खरेदीचा प्रभाव आहे. त्यातून ब्रॅंडच्या वाढीचा कल, प्रवाह कायम राहत आहे. या सकारात्मक प्रवासास चालना देततनेराने आपल्या पहिल्यावहिल्या राष्ट्रीय सेलची घोषणा केली आहे. त्यामध्ये साड्या, रेडी-टू-वेअर सेट्स, अनस्टीच्ड कुर्ता सेट्स आणि सणासुदीसाठीच्या लेहेंगासारख्या विविध श्रेणींमध्ये तयार केलेल्या शुद्ध व नैसर्गिक धाग्यांपासून बनवलेल्या उत्पादनांवर ४० टक्के पर्यंत सवलत दिली जात आहे. ४१ शहरांमध्ये ८० दालनांचे मजबूत राष्ट्रीय जाळे असलेल्या तनेएराने पारंपरिक वस्त्रप्रावरण परिधानसाठी प्रमुख पर्याय म्हणून आपले स्थान अधिक दृढ केले आहे. यावर्षी सणासुदीचा हंगाम लवकर सुरु होत असताना हा सेल या हंगामाची सुरुवात झाल्याचे जाहीर करण्यासाठी आणि ग्राहकांना तनेएराच्या वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन ठळकपणे सिद्ध करणाऱ्या शुद्ध आणि अस्सल उत्पादनांचा संग्रह करण्याची संधी देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.या प्रसंगी बोलतानामुख्य विक्री आणि विपणन अधिकारी सोमप्रभ कुमार सिंगम्हणाले, "पहिल्यांदाच इतक्या विस्तृत श्रेणीवर आम्ही एवढी सवलत देत असून उत्पादने




४० टक्केपर्यंत सवलतीत उपलब्ध आहेत. ही सवलत योजना म्हणजे तनेएरा ब्रॅंड ज्यासाठी ओळखला जातो त्या शुद्धता व समृद्धतेच्या अनुभवाबरोबर मिळणारा एक अतिरिक्त लाभ आहे. अस्सलरीत्या मिळवलेली हस्तकला उत्पादने तसेच प्रत्येक पोषाखात मिळणारी शुद्धतेची आणि गुणवत्तेची हमी याद्वारे आमच्या चोखंदळ ग्राहकांसाठी हा अनुभव खास बनविण्याचे आमचे ध्येय आहे."बनारसी, कांजीवरम, जामदानी ते टसर यांसारख्या विविध प्रकारच्या साड्या ब्रॅंडच्या पोतडीत असून त्या भारतातील विणकाम परंपरा जपणाऱ्या कारागिरांना एक सलाम आहे. प्रत्येक तनेएरा दालन साडीप्रेमींसाठी एक निवासस्थानासारखे डिझाइन केलेले असूनयेथे लग्नासाठी विशेष विभाग, सणासुदीच्या कार्यक्रमाच्यावेळी परिधान करायच्या कपड्यांचा वेगळा विभाग आणि रोजच्या वापरातील आवश्यक गोष्टी एकाच छताखाली उपलब्ध आहेत. ग्राहकांसाठी सिल्क, कॉटन इकत, कोटा डोरिया, चंदेरी आणि महेश्वरी, साउथ सिल्क्स, संबळपुरी आणि व्हेगन कलेक्शन्ससारख्या विविध विणकाम केंद्रांमधून खास निवडलेली उत्पादनेही उपलब्ध आहेत. हर एक पोषाखातून भारताच्या समृद्ध वस्त्र परंपरेचा गौरव करत गुणवत्तेच्याबाबतीत तडजोड न करणाऱ्या तनेएरा कडून अस्सल कारागिरीचे चिन्ह म्हणून 'शुद्ध झारी कांजीवरम' असे प्रमाणपत्र दिले जाते. ग्राहक नवी मुंबईतीलइनऑरबिट मॉल येथील तनेएरा शोरूम मध्ये ही सवलत घेऊ शकतात.

# मेनिन्जिओमाच्या दुर्मीळ विकारावर ८५ वर्षीय महिलेची यशस्वी मात

## ४.७ सेमी ब्रेन ट्यूमर काढण्यात डॉक्टरांनी यश - खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**

गोंधळ उडणे, गुंगी येणे आणि हातपाय सुजणे यासारख्या गंभीर लक्षणांनी एक ८५ वर्षीय महिला त्रस्त झाली होती. तिला दुर्मिळ अशा मेनिन्जिओमाचे निदान झाले जो एक प्रकारचा ट्यूमर आहे व तो मेंदू आणि पाठीचा कणा झाकणाऱ्या ऊतींचे तीन थर असलेल्या मेनिंजेसमधून उद्भवतो. खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने तिच्यावर यशस्वीपणे उपचार केले. त्यामुळे तिची या दुर्मिळ विकारातून सुटका होऊन ती आता पुर्वीप्रमाणे तिचे दैनंदिन जीवन जगत आहे. रुग्णाच्या वाढत्या वयामुळे उद्भवणाऱ्या गुंतागुंतीवर मात करत *वरिष्ठ न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक* यांच्या नेतृत्वाखालील टिमने दुर्मीळ अशा मेनिन्जिओमावर यशस्वी उपचार केले. नवी मुंबईतील खारघर येथे राहणाऱ्या ८५ वर्षीय श्रीमती अनिता सुर्वे (नाव बदलले आहे)* यांना त्यांच्या नातेवाईकांनी मेडिकव्हर हॉस्पिटलच्या आपत्कालीन कक्षात दाखल केले. १५ दिवसांपासून गोंधळ उडणे, गुंगी येणे आणि हातपाय सुजणे यासारख्या गंभीर लक्षणांनी रुग्णाला जगणे असह्य झाले होते. उच्च रक्तदाबाचा इतिहास असलेल्या आणि यापूर्वी दुहेरी गुडघे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झालेल्या या रुग्णाच्या प्रकृतीत अचानक आणि चिंताजनक बदल दिसून आले. प्राथमिक तपासणीत दोन्ही पायांमध्ये सूज, रंग बदलल्याचे दिसून आले. त्यानंतर ताबडतोब प्राथमिक उपचार सुरू झाले, सीटी स्कॅन आणि डॉप्लर स्टडीसह अनेक तपासण्या करण्यात आल्या. सीटी ब्रेन स्कॅनमध्ये डाव्या बाजूच्या पुढच्या भागात सुमारे ४.७ x ३.५ x ५ सेमी आकाराची एक मोठी गाठ आढळली, जो मेनिन्जिओमाचे निदान करते व जी मेंदू आणि पाठीचा कणा झाकणाऱ्या ऊतींचे तीन थर असलेल्या मेनिंजेसमधून उद्भवते. या गाठींमुळे मेंदूच्या संरचनेवर दबाव येत होता. वरिष्ठ न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक सांगतात की,* मेनिन्जिओमा हा एक प्रकारचा ट्यूमर आहे जो मेंदू आणि पाठीच्या कण्याभोवती असलेल्या ऊतींचे संरक्षक थर असलेल्या मेनिन्जमध्ये विकसित होतो. मेनिन्जिओमाचे प्रमाण प्रति १ लाख लोकसंख्येमागे ८ इतके आहे. सर्वात सामान्य प्रकार ग्रेड १ किंवा ठराविक मेनिन्जिओमा आहेत, जे सर्व प्रकरणांपैकी ८०-८१% आहेत. मेंदूच्या इमेजिंग दरम्यान अनेक मेनिन्जिओमाचे निदान केले जाते. वाढत्या वयानुसार या घटनांमध्ये वाढ होते. पुरुषांपेक्षा महिलांना मेनिन्जिओमाचे निदान होण्याची शक्यता जास्त असते, ज्यामध्ये महिला-पुरुष प्रमाण २.३:१ इतके असते. मेनिन्जिओमा गंभीर मेंदूच्या संरचनेवर दबाव निर्माण करतात. बऱ्याचदा ते जीवघेणे ठरू शकतात. वरील प्रकरणात रुग्णाचे वय आणि लक्षणे पाहता त्वरीत उपचारांची आवश्यकता होती. आम्ही ट्यूमर काढून टाकण्यासाठी कवटीची शस्त्रक्रिया करून क्रॅनियोटॉमी केले. वय जास्त असूनही, रुग्णाने शस्त्रक्रियेस चांगला प्रतिसाद दिला. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला निरीक्षणाखाली ठेवण्यात आले, ज्यामध्ये व्हेंटिलेटर सपोर्ट, रक्तसंक्रमण आणि अतिदक्षता विभागाचा समावेश होता, असे डॉ. नाईक यांनी स्पष्ट केले. *डॉ. नाईक पुढे सांगतात की,* क्रॅनियोटॉमी यशस्वीरित्या पार पडली आणि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी २०० ग्रॅम वजनाचा ट्यूमर काढण्यात आला. ही शस्त्रक्रिया सुमारे ३ तास चालली आणि तिला आयसीयूमध्ये व्हेंटिलेटर सपोर्टसह तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आले, आयव्ही फ्लुइड्स, अँटीबायोटिक्स, मल्टीव्हिटॅमिन देण्यात आले आणि नंतर रक्त संक्रमणाची आवश्यकता भासली. फॉलो-अप सीटी स्कॅनने ट्यूमर यशस्वीरित्या काढून टाकला. डीव्हीटी पंपने तिच्या पायाचा लालसर रंग दूर करण्यात आला. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी तिला सामान्य वॉर्डमध्ये हलवण्यात आले, ज्यामध्ये लक्षणीय सुधारणा दिसून झाली. तिला आता कोणतीही लक्षणे दिसत नाहीत आणि ७ दिवसांनी तिला घरी सोडण्यात आले. तिच्यावर त्वरित उपचार न केल्यास बोलणे कमी होणे, वर्तणुकीशी संबंधित समस्या, आकुंचन/झटके आणि हातपाय कमकुवत होणे यासारख्या गुंतागुंत होऊ शकतात. दोन आठवड्यांच्या फॉलो-अपमध्ये तिच्या प्रकृतीत सुधारणा दिसून आली तसेच तिने तिचा दैनंदिन दिनक्रम यशस्वीरित्या सुरू केला या वयात असे काही घडेल अशी मी कधीच कल्पना केली नव्हती. पण मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी माझ्यावर यशस्वी उपचार करत मला जगण्याची दुसरी संधी मिळाली. मला बरे होण्यास आणि माझ्या दैनंदिन दिनचर्येत परतण्यापर्यंत मला सर्वच स्तरावर मदत केल्याबद्दल मी संपूर्ण टीमची आभारी आहे,असे रुग्ण श्रीमती अनिता सुर्वे (नाव बदलले आहे)* यांनी स्पष्ट केले

# महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन रायगड जिल्हा अध्यक्षपदी अ‍ॅड. नागेश हिरवे

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून नवीन पनवेल येथील अडव्होकेट तथा पब्लिक नोटरी वकील नागेश अरविंद हिरवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद सिकंदर अली, असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष अड. यशवंतराव खराडे तसेच सचिव अड. प्रवीण नलावडे यांच्या सहीचे नियुक्तीपत्र अड. नागेश हिरवे यांना देण्यात आले आहे.

अड. नागेश हिरवे हे रायगड जिल्ह्यात २०१२ पासून वकिली व्यवसाय करीत आहे. तसेच ते विधी सेवा समिती, पनवेल च्या पॅनलवर कार्यरत असून अनेक गरीब आणि गरजू लोकांना मोफत न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सहकार्य केले आहे. तसेच पर्यावरण क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य चालू आहे.

नुकतीच केंद्र सरकारतर्फे संपूर्ण भारतात मोठ्या संख्येने नवीन नोटरी वकिलांची नियुक्ती झाली आहे. परंतु तांत्रिक अडचणीमुळे बऱ्याच नवनियुक्त नोटरी वकिलांना त्यांचे नोटरी लायसन मिळवण्यासाठी अडचणी येत होत्या. या तांत्रिक अडचणी सोडवून संपूर्ण महाराष्ट्रातील बऱ्याच नवनियुक्त नोटरी वकिलांना नोटरी लायसन मिळवून देण्यासाठी अड. नागेश हिरवे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या विशेष कार्याची दखल घेत महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन तर्फे त्यांची रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. भविष्यात जुन्या व नवीन नोटरी बांधवांना नोटरी सेवा देताना येणाऱ्या अडीअडचणी तसेच या क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न, समस्या महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या माध्यमातून केंद्र सरकारपर्यंत मांडून त्या मार्गी लावण्याचे काम करणार असल्याचे अड. नागेश हिरवे यांनी सांगितले. त्यांच्या या नियुक्तीबद्दल पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अड. मनोज भुजबळ यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# "पगार रायगडचा, काम मंत्रालयात!" सिव्हिल सर्जन डॉ. देवमाने यांच्या प्रतिनियुक्तीवरून संतापाची लाट, मुख्यमंत्री कार्यालयात तक्रार दाखल

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

"रायगड जिल्ह्याच्या आरोग्यसेवेशी खेळ माफक करू नका!" अशा ठणकावणाऱ्या शब्दांत सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी रायगड जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन) डॉ. अंबादास देवमाने यांच्या प्रतिनियुक्तीवर आक्षेप घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे.प्रश्न असा की पगार घेणार रायगड जिल्ह्याचा आणि सेवा बजावणार मंत्रालयात? डॉ. देवमाने यांची प्रतिनियुक्ती आरोग्यमंत्री यांच्या मंत्रालयातील कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आली आहे. पण त्यांचे वेतन आणि भत्ते




हे रायगड जिल्ह्यातील सिव्हिल सर्जन पदावरूनच दिले जाणार आहेत. ही बाब निषेधार्ह असल्याचे सावंत यांनी म्हटले आहे.शासन निर्णय गुपचूप? मुख्यमंत्र्यांची मंजुरी कुठे? सावंत यांनी सादर केलेल्या तक्रारीनुसार, ही प्रतिनियुक्ती सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 5 फेब्रुवारी 2025 च्या शासन निर्णयानुसार केल्याचे सांगितले जाते. मात्र, हा शासन निर्णय शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला नाही, तसेच संबंधित आदेशात मुख्यमंत्री कार्यालयाच्या मंजुरीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे ही नियुक्ती पारदर्शक प्रक्रियेच्या बाहेर, मुख्यमंत्री कार्यालयापासून लपवून केली गेली असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे.ज्येष्ठतेची पायमल्ली, आरोग्य यंत्रणेला धक्का,तक्रारीत असेही नमूद करण्यात आले आहे की, डॉ. देवमाने हे ज्येष्ठता यादीत कनिष्ठ असून त्यांच्यापेक्षा अधिक पात्र आणि वरिष्ठ अधिकारी प्रतीक्षेत आहेत. अशावेळी नियम डावलून झालेली ही नियुक्ती धक्कादायक असल्याचे सावंत म्हणाले. रायगडसारख्या मोठ्या जिल्ह्याला सिव्हिल सर्जन हवा की मंत्रालयाला? रायगड जिल्हा भौगोलिकदृष्ट्या मोठा व दुर्गम भागांनी व्यापलेला आहे. जिल्हा शल्य चिकित्सक हे जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेचे प्रमुख असून त्यांच्यावर रुग्णालये, वैद्यकीय कर्मचारी, आणि योजनांची अंमलबजावणी यांसारखी जबाबदारी असते. त्यामुळे सिव्हिल सर्जन पद रिकामे ठेवून मंत्रालयात अधिकारी पाठवणं म्हणजे जिल्ह्याच्या आरोग्यसेवेवर थेट घाला असल्याचे सावंत म्हणाले. तत्काळ चौकशी व नियुक्ती मागणी; सावंत यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात मागणी केली आहे की, सदर प्रतिनियुक्ती आदेश त्वरित रद्द करून डॉ. देवमाने यांना त्यांच्या मूळ पदावर परत पाठवण्यात यावे. तसेच या पदावर कार्यक्षम आणि नियमबद्ध पद्धतीने नवीन अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. हे प्रकरण केवळ एक प्रतिनियुक्तीचे नसून, सरकारी प्रक्रिया आणि पारदर्शकतेवर उभे राहिलेले गंभीर प्रश्न उपस्थित करते. रायगडकरांच्या आरोग्याच्या हक्कावर गदा येऊ देणार नाही, असं म्हणत संजय सावंत यांनी या लढ्याचा बिगुल फुंकला आहे.

# शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान २०२५' गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून 'स्वराज्य प्रतिष्ठान'च्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५' सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात पत्रकार व माहिती अधिकार कार्यकर्ते किशोर रमाकांत गुंडेकर यांना त्यांच्या सामाजिक आणि पत्रकारितेतील योगदानाबद्दल 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. हुतात्मा बाबू गेनू स्मारक समिती (निवेदित) यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या पुरस्काराने श्री. गुंडेकर यांच्या कार्याची राज्यस्तरीय पातळीवर दखल घेण्यात आली असून त्यांच्या कार्याला एक नवा सन्मान मिळाला आहे.




# तलावातील पाण्यामध्ये आढळला महिलेचा मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



: उलवे परिसरातील असलेल्या तलावातील पाण्यामध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध उलवा पोलीस करीत आहेत सदर महिलेचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, केस लहान काळे (विखुरलेले), डोळे उघडया स्थितीत, तोंड उघडे व जीभ बाहेर आलेली, चेहरा गोल, बांथा मध्यम, नेसणीस गडद निळा रंगाचा कुर्ता त्यावर फुलांची डिझाईन असलेली, फिकट लाल रंगाचा गमचा सदृश्य टॉवल, काळी तपकिरी लाल रंगाची फुला- फुलांचा पायजमा आणि डाव्या पायात एक निळ्या रंगाची स्लिपर घातलेली आहे. या महिला बद्दल कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे मो. ८६६९७८९१०० किंवा सहा. पोलीस निरीक्षक अजित कणसे यांच्याशी संपर्क साधावा .

# वटपौर्णिमा या पवित्र दिनानिमित्त रिक्षा चालक यांना पावसाळी पडदे वाटप

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**




वटपौर्णिमा या पवित्र दिवशी रिक्षा चालक यांना पावसाळी पडदे वाटप सौ संगिताताई दिलीप आमले उपजिल्हाप्रमुख शिवसेना नवी मुंबई

महाराष्ट्र राज्याचे गोरगरीब जनतेसाठी झटणारे मा श्री एकनाथ शिंदे साहेब उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली या विजय नाहटा साहेब शिवसेना उपनेते मा अशोक गावडे साहेब शिवसेना नेते नवी मुंबई यांच्या विशेष सहकार्याने रिक्षा चालकाचे नेते मा दिलीप किसनराव आमले आपला माणूस जिल्हाध्यक्ष नवी मुंबई शिव वाहतूक सेना रिक्षाचालक-मालक सेवाभावी संस्था तसेच त्रिमूर्ती महिला मंडळ अध्यक्षा शिवसेना उपजिल्हाप्रमुख सौ संगीताताई दिलीप आमले* संचालिका अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल यांच्या विशेष सहकार्याने वटपोर्णिमा या पवित्र दिवशी विभागातील रिक्षा चालक यांना मोफत रिक्षाचे पावसाळी पडदे वाटप करण्यात आले यावेळी शिवसेना शाखा संघटिका सौ संगीता दाते सौ थोरवे, सौ थोरात ,सौ राजपूत,श्री रॉय उपविभाग प्रमुख श्री गुप्ता श्री मिश्रा तसेच विभागातील अनेक महिला व रिक्षा चालक पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते पामबिच टॅक्सी स्टॅंड या ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाला

# श्रीस्वामी समर्थ केंद्राच्या वतीने लोणजाई डोंगरावर वडाचे झाडाचे वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**





जन्मोजन्मी पती-पत्नीचे नाते असेच अखंड रहावे,अशी प्रार्थना करत मंगळवारी ज्येष्ठ पौर्णिमा अर्थात वटपौर्णिमेला निफाड तालुक्यातील लोणजाई माता मंदिर परिसरातील डोंगरावर निफाड येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या महिला सेवेकऱ्यांनी वडाच्या झाडाची लागवड केली. आजच्या आधुनिक युगातही हा दिवस तितक्याच पारंपारक पद्धतीने साजरा केला जातो जन्मोजन्मी हाच पती मिळावा याचबरोबर वृक्षपूजा करून निसर्गाचे सव्रर्धन करून त्याची पर्यावरणाच्या दृष्टीने जोपासना करणे हा ही वटपौर्णिमेचा हेतू आहे.

वटसावित्री पौर्णिमेनिमित्त महिलांनी लोंजाई डोंगरावरील वडाच्या झाडाची पूजा केली.विशेष म्हणजे ७ ते ८ वर्षांपूर्वी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रानेच या ठिकाणी वडाचे झाडे लावले होते त्यातील बरीच झाडे आता मोठी होत आहे.त्याच झाडाची वटसावित्री पौर्णिमेनिमित्त पूजा केल्याने एक मानसिक समाधान आनंद मिळाल्याचे या महिलांनी सांगितले. वटसावित्री पौर्णिमा साजरी करताना पर्यावरण संदेश आणि वसुंधरा पूजन असा संदेश या निमित्ताने दिला गेला आहे.यावेळी वि.दा. व्यवहारे सर,सुभाष खाटेकर, सूर्यभान टरले,प्रफुल्ल शिवदे,मधुकर सोनार,सोनाली व्यवहारे, वैशाली खाटेकर, छाया श्रीवास्तव,हर्षदा राऊत, नलिनी कुंभार्डे,जयश्री बागडे, रत्ना विसपुते, घुमरे, जया कायस्थ ,लता टर्ले,सेंद्रे, कुसुम बनकर, रोहिणी जाधव, बागूल,सुनीता कुंदे,शिवदे,गायत्री कायस्थ तसेच अनेक महिला सेवेकरी उपस्थित होते.

# कर्जाला कंटाळून युवा शेतकऱ्याची विष प्राशन करून आत्महत्या

## पिंपरी (सावित्री) येथील घटना

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



**राळेगाव:-** तालुक्यातील पिंपरी(सावित्री ) येथील एका ३० वर्षीय शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला व नापीकीला कंटाळून स्वतःच्या शेतात विष प्राशन करून आत्महत्या केली.ही घटना मंगळवार दि.१० जुन रोजी ५ च्या सुमारास उघडकीस आली नामे प्रशांत गणेशराव भोयर वय ३० रा.पिंपरी (सावित्री) असे मृत युवा शेतकऱ्याचे नाव असून, शासनाकडून कर्जमाफी होईल या भोळ्या आशेवर त्याने कर्ज घेतले होते. मात्र शासनाने कर्जमाफीची कोणतीही घोषणा न केल्यामुळे त्यांने टोकाचे पाऊल उचलले आणि स्वत च्या शेतात जाऊन विष प्राशन केले, सततची नापिकी आणि सरकारी बँकेचे १५ लाख रुपये कर्ज आणि काही खाजगी कर्ज वाढल्यामुळे या विवांचनेत राहून प्रशांत याने स्वतःच्या शेतातच विष प्राशन करून आत्महत्या केल्याची चर्चा आहे, त्याच्या जाण्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे,वडकी पोलिसांनी घटनेची नोंद केली असून शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला,त्याचे पार्थिवावर मालकीच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले आणि त्यांच्या पश्चात आई,भाऊ, पत्नी,असा बराच आप्त परिवार आहे.

# राळेगाव उपविभागातील शेतकऱ्यांना विना अट डिएपी खते उपलब्ध करून द्या

## मनसेची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव :-** मान्सून तोंडावर आला असल्याने शेती कामाला वेग आला ज्यात पेरण्या करून प्रथम प्रक्रिया पार पडण्यास सुरुवात झाली. कापूस, मका, ज्वारी, बाजरी, सोयाबीन, ऊस या पिकांच्या आपल्या भागात पेरण्या करण्यास सुरुवात झाली आहे. मात्र पेरणी करताना बरोबरच लागणारे खते राळेगांव उपविभागात नसल्याने शेतकऱ्यांना पेरण्यात अडथळा निर्माण होत आहे. सध्या कृषी केंद्र चालकांकडून डीएपी खताचा काळाबाजार करून कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे. तर याच खतांच्या खरेदी बरोबर लिंकिंग ची एक अट कृषी केंद्र चालकांकडून सुरु करून शेतकऱ्यांची आर्थिक लुट चालू आहे. यामुळे परिसरातील शेतकरी बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या काळाबाजार करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना विना अट डिएपी खत उपलब्ध



करून देण्याची मागणी मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी केली आहे.खरीप हंगामाच्या तोंडावर डीएपी खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जावून ही बाब गंभीर आहे.पिकांच्या वाढीसाठी डीएपी खत अत्यंत आवश्यक आहे. परंतु,सध्याच्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांची पेरणी लांबणीवर पडत आहे आणि यामुळे त्यांच्या शेती उत्पन्नावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. कृषी केंद्र चालक या खताचे साठे करून जादा दराने विकत आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना हे खते महागड्या भावाने खरेदी करणे परवडणारे नाहीत. गेल्या अनेक वर्षापासून खताच्या मोठ्या पिशवी सोबत लहान लहान पुड्यां खरेदी करण्यासाठी कृषी केंद्र चालकांनी निर्बंध लावलेले आहे.वास्तविक पाहता ह्या पुड्या खत कंपन्याकडून नमुना स्वरुपात निशुल्क येतात. सदर खतासोबत ह्या पुड्या वापरल्यास खतांचा प्रभावी परिणाम पिकांवर होतो असे सांगून अव्वाच्या सव्वा दरात शेतकऱ्यांच्या माथी मारण्यात येते. जर ह्या लहान पुड्या घेतल्या नाही तर शेतकऱ्यांना खत दिल्या जात नाही.शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने शेतीची तयारी केली आहे आणि आता खत उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे सर्व नियोजन कोलमडले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येची दखल घेऊन, आपण तात्काळ राळेगांव उपविभागात डी.ए.पी. खताचा पुरवठा सुरळीत व कोणतीही अट न लावता हे खते शेतकऱ्याना देण्यात यावे यासाठी कृषी विभागांना आदेश द्यावेत,तसेच तालूक्यातील सर्व कृषी केंद्रावर छापे टाकून साठेबाजी करणाऱ्या कृषी केंद्र चालकांचे परवाने रद्द करावे. जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळून त्यांचे संभाव्य नुकसान टाळता येईल. अन्यथा शेतकऱ्यांच्या हितार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरुन तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडेल असा ईशारा मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी जिल्हाधिकारी विकास मिना यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# सन्मान द्या आणि सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत

दैनिक युवक आधार
वार्ताहर

पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय ऑफलाईन स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी सत्कार, रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी व विविध सामाजिक क्षेत्रातील 76 कार्यकर्त्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम संपन्न माजी खासदार खुशाल बोपचे ,मुख्य संपादक दैनिक माझा मराठवाडा दशरथ सुरडकर ,जटा टीव्ही चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे ,सरपंच शिवशंकर मुंगाटे आवर्जून उपस्थित भंडारा -दिनांक 11 जून 2025 ला प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे संपादक ,जनता टाईम/ जटा टीव्ही चे प्रतिनिधी संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसाचे औचित साधून सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत जे विविध सामाजिक क्षेत्रात काम करतात व त्यांच्या कार्याची दखल कुठेतरी व्हावी व त्यांना त्यांच्या कार्याचा मान सन्मान व्हावा या उदात्त हेतूने कार्यक्रमाचे आयोजन पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे करण्यात आले होते .वाढदिवस हे फक्त नाममात्र निमित्त होते. परंतु तळागाळातील कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याची पावती म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत महाकारुणी तथागत गौतम बुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षण महर्षी महात्मा



ज्योतिबा फुले ,आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज, यांना सर्वप्रथम अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रबोधनकार भावेश कोटांगले यांनी पत्रकार संजीव भांबोरे यांच्यावर आधारित गीत सादर केले .त्यानंतर ४ वाजता राज्यस्तरीय घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम अंकित वसंता लोंदासे , द्वितीय दुर्गेश विलास लोंदासे, तृतीय सुमेध खुशाल खोपे ,विद्यार्थ्यांचा अनुक्रमे 1001, 701 ,501 ,रुपये , सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ व मानाचा फेटा बांधून मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सत्कारमूर्ती पत्रकार संजीव भांबोरे यांचा दैनिक माझा मराठवाडा चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर यांनी भव्य दिव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला, जनता टाईम /जटा टीवी चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे यांनी भव्यदिव्य तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला .सरपंच शिवशंकर मुंगाटे यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. प्रेस संपादक पत्रकार सेवा संघटनेचे भंडारा जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे ,व भंडारा जिल्हा प्रभारी डॉ.अक्षय कहालकर ,उपाध्यक्ष सुरज गोंडाने, पत्रकार ऋग्वेद येवले यांच्या वतीने सन्मानचिन्ह , गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. अभय रंगारी सामाजिक कार्यकर्ते यांच्यावतीने सुद्धा पुष्पगुच्छ सन्मानपत्र, सन्मान चिन्ह ,देऊन सत्कार करण्यात आले.सामाजिक कार्यकर्ते सदानंद धारगावे यांनी सुद्धा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तिरुपती गिफ्ट एम्पोरियम भंडारा यांनी सुद्धा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले .त्याचप्रमाणे विविध सामाजिक क्षेत्रातील कवी ,लेखक ,साहित्यिक, पत्रकार ,प्रबोधनकार , डॉक्टर ,सामाजिक कार्यकर्ते यांचा सन्मानचिन्ह, सन्मान प्रमाणपत्र, मानाचा फेटा व पुष्पगुच्छ देऊन व भारताचे संविधान मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यात प्रामुख्याने माजी खासदार खुशाल बोपचे, दैनिक माझा मराठवाडा विभागीय संपादक दसरथ सुरडकर, मराठवाडा विभागीय संपादक गोकुळ सिंग राजपूत, कार्यकारी संपादक संजय दांडगे, परशुराम दिघोरे, प्राध्यापक राजेश नंदपुरे, शंकर भेंडारकर, विजयकुमार डहाट,सदानंद धारगावे ,अमरकंठ समरीत, अभय रंगारी, रोशन जांभुळकर, लोकनाथ रायपुरे, पंकज वानखेडे , ,डॉ. अक्षय कहालकर ,गणेश पारधी, जीवन बोधी बौद्ध, डॉ.गणेश मेश्राम, प्राध्यापक अशोक वाहने ,सरपंच शिवशंकर मुंगाटे, पत्रकार आशिष चेंडगे, प्रबोधनकार भावेश कोटांगले ,प्राध्यापक राहुल डोंगरे ,पत्रकार ऋग्वेद येवले , ,भीमराव टेंभुर्णे ,मनोज चिचगरे ,विजय नंदागवळी, सतीश सोमकुवर, सुनील सूर्यवंशी, कुलदीप गंधे, कवी नाशिक चवरे, पत्रकार शशिकांत भोयर,विलास बांडेबुचे, गुलाब घोडसे, अर्पित मेश्राम ,विनय ढोके ,विकास टेंभुर्णे ,अमोल थुलकर ,सोहेल खान , मुनेश्वर बोदलकर ,प्रेमसागर गजभिये ,विजय खोब्रागडे, अशा विविध सामाजिक क्षेत्रातील 76 कार्यकर्त्यांचा माजी खासदार तथा अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष खुशाल बोपचे ,दैनिक माझा मराठवाड्याचे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,जनता टाईम/जटा टीव्ही चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे, अड्याळ येथील सरपंच शिवशंकर मुंगाटे,संविधान संघर्ष समिती चे भंडारा जिल्हा अध्यक्ष रोशन जांभुळकर ,साहित्यिक अमृत बनसोड, शांतीवन बुद्ध विहाराचे संचालक जीवनबोधी बौद्ध ,सत्कारमूर्ती प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा संपादक, त्याचप्रमाणे जनता टाईम / जनता टीव्हीचे प्रतिनिधी संजीव भांबोरे ,दैनिक माझा मराठवाडा कार्यकारी संपादक संजय दांडगे, दैनिक माझा मराठवाडा विभागीय संपादक गोकुळ सिंग राजपूत, यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आले . यावेळी वाढदिवसानिमित्त समर्पण ब्लड बँक भंडारा यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नेत्रसेवा हॉस्पिटल भंडारा यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला महिला व युवक यांनी सहकार्य करून आपला सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना सन्मान प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. त्याचं प्रमाणे सर्व सत्कार मूर्तींना जेवणाची सुद्धा सुविधा करण्यात आली होती.आपलाही स्पर्धेत कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक राजेश नंदपुरे यांनी केले तर सर्व मान्यवरांचे आभार प्रबोधनकार भावे कोटांगले यांनी मानले .रक्तदान शिबिर यशस्वी करण्याकरता अर्पित मेश्राम व संदीप नवले यांच्या टीमने उत्कृष्ट सहकार्य केले .त्याचप्रमाणे पंकज वानखेडे,आशिष मेश्राम ,प्रमोद वासनिक, अंबादास मेश्राम यांनी मोलाचे सहकार्य केले.

# शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार संपादक**
**संतोष शिवदास आमले**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा 351 वा शिवराज्याभिषेक दिन संपूर्ण देशभर साजरा केला जात आहे. याच पावन दिनाचे औचित्य साधून हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिनव पद्धतीने अभिवादन करण्याच्या उद्देशाने नुकत्याच झालेल्या शालांत परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश कार्यालय मलकापूर येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्याअर्पण करून करण्यात आली कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धनश्रीताई काटेकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, अजय टप विदर्भ अध्यक्ष, श्रीकृष्ण तायडे जिल्हा अध्यक्ष, रवींद्र गणगे सर जिल्हा सचिव, हे होते सदर कार्यक्रमात शालांत परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सुवर्णपदक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये नेहा विजय मेहसरे ,आनंदी विजय जावरे, भारती अनिल वानखेडे ,प्रीती अनिल वानखेडे ,गायत्री धर्मसिंह राजपूत, शबाना निसार शेख ,श्रेया विजय मेहसरे ,आधिराज श्रीकृष्ण तायडे ,रणवीर प्रदीप इंगळे,वेदांत भगवान चोपडे ,तुषार प्रदीप इंगळे ,जय विकास गाढे ,मोहम्मद जीशान मोहम्मद शकील ,मोहम्मद जियान मोहम्मद शकील ,मोहम्मद अर्शद मोहम्मद सलीम ,मोहम्मद फैयाज मोहम्मद इसाक,मोहम्मद उमरे मोहम्मद जुबेर ,मोहम्मद शहीद मोहम्मद साबीद इत्यादी विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा प्रकाश थाटे , रवी गव्हाळे ,शेख निसार, प्रदीप इंगळे, धर्मेश राजपूत, सुधाकर तायडे, मयूर लड्डा, सय्यद ताहेर, शकील कुरेशी शिक्षक उर्दू गर्ल हायस्कूल यांनी परिश्रम घेतले



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## प्रहारचे विविध मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाडला प्रहारचे अन्नत्याग आंदोलन

माजी मंत्री बच्चुभाऊ कडू यांनी गुरुकुंज मोझरी येथे ८ जून पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, दिव्यांग महिला व वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी परंतु शासनाने रास्त मागण्यांबाबत कुठलाही निर्णय व दखल घेतलेली नाही त्यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटना व प्रहार युवा आघाडीच्या वतीने निफाड उपविभागीय कार्यालय येथे गुरुवार दि.12 जून रोजी सकाळी 11 वाजेला दोन दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार आहेत.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्य मंत्री बच्चू भाऊ कडू यांना आंदोलनाला बळ देण्यासाठी निफाड तालुक्यातील दिव्यांग बांधव, वृद्ध महिला,शेतकरी बांधव हे मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपोषणास उपस्थितीत रहावे असे आव्हान प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे निफाड तालुकाध्यक्ष सोमनाथ धुमाळ यांनी केले.

यावेळेस निफाड तहसील कार्यालयाच्या आवारात हे उपोषण होणार असून यात उपोषणकरते जयेश जगताप, सोमनाथ धुमाळ,अनिल भावसार,नवनाथ घोटेकर,संतोष पांडव,बाळू वाघचौरे, संजय विसपुते,रोशन तिडके,कपिल मूळक व कार्यकर्ते उपोषण ठिकाणी बसणार आहेत.



## डोळंबा, कोपरा ,पिंपरी शिवारात वादळी पावसाचे थैमान

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**



तालुक्यातील डोळंबा, कोपरा आणि महागाव परिसरात सोमवारी, (दि. ९) जून रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार थैमान घातले. यात अनेकांच्या घरांवरील टिनपत्रे उडून गेली, तर मोठमोठी झाडे उन्मळून पडल्याने जनजीवन विस्कळीत होऊन मोठे नुकसान झाले.अरुण नामदेव साखरकर रा .पिंपरी यांच्या शेतातील झाडाखाली बांधलेल्या बैलावर झाड पडून बैल मृत पावला यात शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले.

सकाळपासूनच्या असह्य उकाड्यानंतर आलेल्या या वादळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. हाता-तोंडाशी आलेली शेतातील तीळ, उन्हाळी ज्वारी पिकांसह आंब्याच्या फळबागांचेही अतोनात नुकसान झाल्याने बळीराजा पूर्णपणे हवालदिल, चिंतातूर झाला आहे. शिवारातील एका शेतातील गोठ्यावर भलेमोठे झाड कोसळून गोठ्याचेही प्रचंड नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावरील मुख्य लाईनचे विद्युत खांब कोसळल्याने कोपरा ते डोळंबा मार्गावरील वाहतूक अनेक तास ठप्प व पूर्णपणे बंद होती. तसेच, आर्णी-दिग्रस मार्गावरील कोपरा-पिंपरी फाट्यासमोरही वडाच्या झाडाचा एक मोठा भाग कोसळल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. या पावसाने वातावरणात मात्र काही काळ सुखद गारवा निर्माण केला होता.

## एसीला शॉर्ट सर्किटमुळे आग ; सेल्स ऑफिस आगीच्या भक्षस्थानी

दैनिक युवक आधार
पनवेल (वार्ताहर)

: एसीला शॉर्ट सर्किट मुळे आग लागून सेल्स ऑफिस आगीच्या भक्षस्थानी गेल्याची घटना पळस्पे फाटा येथील साई वर्ल्ड सिटी इमारतीच्या आवारात घडली आहे. पळस्पे फाटा येथे साई वर्ल्ड सिटी ही मोठी इमारत आहे.या इमारतीच्या आवारात सेल्स ऑफिस आहे. या ऑफिसमधील एसीजवळ सकाळी साडे नऊ च्या सुमारास शॉर्ट सर्किट झाले.या शॉर्ट सर्किट मुळे ऑफिस ला आग लागली. या आगीचे वृत्त पनवेल महानगरपालिकेच्या पनवेल आणि नवीन पनवेल अग्निशमन दलास समजली.त्यांनी तातडीने सदर ठिकाणी धाव घेतली.तेव्हा स्मोक व्हेंटिलेशन होण्याकरता तडा गेलेल्या काचा तोडण्यात आल्या.अग्निशमन बंबाच्या सहाय्याने ही आग आटोक्यात आणण्यात आली.यासाठी नवीन पनवेल येथील उप अग्निशमन अधिकारी अतुल सकपाळ, अग्निशमन विमोचक प्रमुख मंदार म्हात्रे, यंत्र चालक श्रीकांत आढाऊ, अग्निशामक अविनाश भालेराव,विशाल राऊत,प्रतिक गाडगे, पल्लवी जागले, पनवेल अग्निशमन दलाचे वैभव ओंबासे, मन्सूर,सुदीप ठाकूर,तनय पडवळ,कृष्णा नरवटे,एकनाथ बागूल,मितेश तारेकर आदींनी प्रयत्न केले.



## शेतकरी बांधवांना नैसर्गिक पद्धतीने शेती करा... सहाय्यक कृषी अधिकारी युवराज शिंदे

दैनिक युवक आधार
वाशिम जिल्हा प्रतिनिधी
करण धोंगडे

माझ्या सर्व शेतकरी बांधवानो तुम्हाला विनंती करतो की तुम्ही नैसर्गिक पद्धतीने शेती करा हा संदेश सहाय्यक कृषी अधिकारी यांनी हनवतखेडा येथील शेतकरी बांधवांना दिला आहे.हनवतखेडा ग्रामपंचायत येथील प्रांगणात 10 मे रोजी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन 2025-26 अंतर्गत ओरिएंटेशन एक मोठा प्रचार, प्रसार व ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचा उद्देश नैसर्गिक शेती पद्धतींना प्रोत्साहन देणे तसेच कृषी विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती देणे हा होता.या कार्यक्रमात स्थानिक शेतकरी,सरपंच,प्रतिष्ठित नागरिक,महिला व कृषी विभागातील अधिकारी यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला होता.प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक कृषी अधिकारी युवराज शिंदे,उप कृषी अधिकारी रवींद्र मापारी,सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापन विजय.एस.दुधे, मंडळ कृषी अधिकारी रवींद्र मापारी व कृषी सखी श्रीमती प्रेमलता ताडके व सौ.स्वाती प्रवीण भगत यांची उपस्थिती होती.त्याचबरोबर लक्ष्मी धोंगडे यांनाही सहभागी करण्यात आले होते.या कार्यक्रमामध्ये बीज प्रक्रिया,नैसर्गिक शेती पद्धती व टिकाऊ शेतीसंबंधी माहिती देण्यात आली.स्थानिक शेतकऱ्यांना जागरूकता व प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यशस्वी कार्यक्रमासाठी आयोजकांनी उपस्थितांचे कौतुक केले असून भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांना चालना देण्याचा निर्णय घेतला आहे.




# इक्विटी म्युच्युअल फंडातील ओघ १३ महिन्यांच्या नीचांकावर

**मे मध्ये गुंतवणूक २२ टक्के घसरून १९ हजार कोटींवर**

**नवी दिल्ली :** मे महिन्यात इक्विटी म्युच्युअल फंडांमधील गुंतवणूक २१.६६ टक्क्यांनी घसरून १९,०१३ कोटी रुपयांवर आली असून हा १३ महिन्यातील नीचांक आहे. इक्विटी फंडांमधील गुंतवणुकीत घट होण्याचा हा सलग पाचवा महिना होता. तसेच, गुंतवणूकदारांनी नव्याने निधी गुंतवण्याच्या विभागात निव्वळ गुंतवणुकीचा सलग ५१ वा महिना आहे, असे असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (ॲम्फी) ने मंगळवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार दिसून आले. दुसरीकडे, एप्रिलमध्ये २.२ लाख कोटी रुपयांची आश्चर्यकारक गुंतवणूक झाल्यानंतर, मे मध्ये डेट फंडांनी १५,९०८ कोटी रुपये गुंतवले. एकूणच, म्युच्युअल फंड उद्योगाने मे महिन्यात २९,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक अनुभवली, जी मागील महिन्यात २.७७ लाख कोटी रुपयांचा होती.

मे महिन्यात लार्ज-कॅप फंडांमध्ये १,२५० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली, जी एप्रिलमधील २,६७१ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. मिड-कॅप फंडांमध्ये मे महिन्यात २,८०८ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली, जी मागील महिन्यात ३,३१३ कोटी रुपयांची होती. त्याचप्रमाणे, स्मॉल-कॅप फंडांमध्ये मे महिन्यात ३,२१४ कोटी रुपये गुंतवणूक झाली, जी एप्रिलमधील ३,९९९ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे.




### उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील मालमत्ता विक्रमी ७२.२ लाख कोटींवर

या गुंतवणुकीमुळे उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील मालमत्ता मे महिन्यापर्यंत विक्रमी ७२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे, जी एप्रिल अखेरच्या ७० लाख कोटी रुपयांवरून वाढली आहे.

### इक्विटी-ओरिएंटेड म्युच्युअल फंडांमध्ये १९,०१३ कोटींची गुंतवणूक

आकडेवारीनुसार, इक्विटी-ओरिएंटेड म्युच्युअल फंडांमध्ये मे महिन्यात १९,०१३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली, जी एप्रिलमध्ये २४,२६९ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. अशा निधींमध्ये मार्चमध्ये २५,०८२ कोटी रुपये, फेब्रुवारीमध्ये २९,३०३ कोटी रुपये, जानेवारीमध्ये ३९,६८८ कोटी रुपये आणि डिसेंबरमध्ये ४१,१५६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. इक्विटी फंड श्रेणींमध्ये, फ्लेक्सी कॅप फंडांनी मे महिन्यात सर्वाधिक गुंतवणूक नोंदवली, ज्याने ३,८४१ कोटी रुपये आकर्षित केले. तथापि, इक्विटी-लिंक्ड बचत योजनांमधून ६७८ कोटी रुपयांचा निधी बाहेर गेला. याशिवाय, मूल्य निधी आणि लाभांश उत्पन्न निधीतून अनुक्रमे ९२ कोटी रुपये आणि २१ कोटी रुपयांचा निधी बाहेर गेला.

### मे मध्ये एसआयपी गुंतवणूक उच्चांकी २६,६८८ कोटींवर

मे महिन्यात सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) गुंतवणूक २६,६८८ कोटी रुपयांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली, जी एप्रिलमध्ये २६,६३२ कोटी रुपयांवरून वाढली आहे. एसआयपीचा आतापर्यंतचा सर्वाधिक प्रवाह दर्शवितो की लोक दीर्घकालीन दृष्टिकोनातून म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करत आहेत, असे असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (एएमएफआय) ने मंगळवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार दिसून येते.

एएमएफआयच्या आकडेवारीनुसार, योगदान देणाऱ्या एसआयपी खात्यांची संख्या मे महिन्यात ८.५६ कोटी झाली, जी मागील महिन्यात ८.३८ कोटी होती. गुंतवणूकदारांची पसंती विकसित होत आहे. दीर्घकालीन वाढीच्या दृष्टिकोनामुळे आणि कर्जावरील सावध भूमिकेमुळे इक्विटी आणि हायब्रिड फंडांकडे स्पष्ट कल आहे. किरकोळ गुंतवणुकीचा सहभाग देखील वाढत आहे. म्युच्युअल फंडात आता लोकसहभाग वाढत आहे, असे स्मॉलकेस मॅनेजर आणि ग्रोथ इन्व्हेस्टिंगचे संस्थापक नरेंद्र सिंह म्हणाले.

एसआयपी अंतर्गत एकूण व्यवस्थापन मालमत्ता एप्रिलमध्ये १३.९० लाख कोटी रुपयांवरून १४.६१ लाख कोटी रुपयांवर पोहोचली. एसआयपी एयूएम मे महिन्यात म्युच्युअल फंड उद्योगाच्या एकूण एयूएमच्या सुमारे २०.२४ टक्के होती, एप्रिलमध्ये ती १९.९ टक्के होती. एएमएफआयच्या आकडेवारीनुसार, एसआयपी स्टॉपपेज रेशो मे महिन्यात कमकुवत झाला. मे महिन्यात सुमारे ५९ लाख एसआयपी खाती बंद करण्यात आली, तर ४३ लाख खात्यांसाठी एसआयपी बंद किंवा परिपक्व झाले. मे महिन्यात एकूण एसआयपी खात्यांची संख्या ९.०६ कोटी होती. २६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त एसआयपी आकडे खूप उत्साहवर्धक आहेत, याचा अर्थ असा आहे की नवीन गुंतवणूकीचा पसंतीचा मार्ग एकरकमीपेक्षा एसआयपी आहे, असे मोतीलाल ओसवाल एएमसीचे कार्यकारी संचालक आणि मुख्य व्यवसाय अधिकारी अखिल चतुर्वेदी म्हणाले.



## यंदा ६ जूनपर्यंत भारताकडून ५.१६ लाख टन साखरेची निर्यात

**ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशनची माहिती**

**नवी दिल्ली :** चालू २०२४-२५ विपणन वर्षात भारताने ६ जूनपर्यंत ५.१६ लाख टन साखर निर्यात केली. त्यापैकी सोमालियाला जास्तीत जास्त १,१८,५५३ टन साखर निर्यात झाली, असे व्यापार संघटना 'एआयएसटीए'ने मंगळवारी सांगितले. साखर विपणन वर्ष ऑक्टोबर ते सप्टेंबरपर्यंत चालते. २०२४-२५ विपणन वर्षासाठी भारतात २० जानेवारी २०२५ रोजी साखर निर्यातीला परवानगी देण्यात आली. निर्यातीसाठी परवानगी असलेला एकूण प्रमाण १० लाख टन आहे.

ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशन (एआयएसटीए) नुसार, चालू विपणन वर्षाच्या ६ जूनपर्यंत कारखान्यांनी एकूण ५,१६,७८२ टन साखर निर्यात केली आहे. त्यापैकी, या वर्षी जूनपर्यंत पांढऱ्या साखरेची निर्यात ४.०९ लाख टन, रिफाइंड साखर ८१,८४५ टन आणि कच्च्या साखरेची निर्यात २५,३८२ टन होती.

एका निवेदनात म्हटले आहे की, सुमारे २३,२१९ टन साखर निर्यातीच्या प्रक्रियेत आहे. आतापर्यंत केलेल्या एकूण निर्यातीपैकी, सर्वाधिक निर्यात सोमालियाला १,१८,५५३ टन झाली आहे, त्यानंतर श्रीलंकेला ७६,४०१ टन, अफगाणिस्तानला ७२,८३३ टन आणि जिबूतीला ६९,६०९ टन झाली आहे. AISTA ने अलीकडेच म्हटले होते की केंद्र सरकारने परवानगी दिलेल्या १०,००,००० पैकी एकूण साखर निर्यात ८,००,००० टनांपर्यंत पोहोचू शकते.

## दावा न केलेल्या ठेवींची परतफेड तत्काळ करा



**केवायसी सुलभ करावे : अर्थमंत्र्यांचे नियामकांना आवाहन**

**मुंबई:** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी नियामकांना दावा न केलेल्या ठेवींची परतफेड तातडीने करण्यास आणि केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यास सांगितले. वित्तीय स्थिरता आणि विकास परिषदेच्या (एफएसडीसी) २९ व्या बैठकीत त्यांनी सामान्य नागरिकांचे हित लक्षात ठेवून योग्य दावेदारांचे दावे जलद परत करावेत यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातील केवायसी प्रक्रियेबाबत नागरिकांना उत्तम अनुभव मिळावा यासाठी त्यांनी परिषदेला सक्रिय पावले उचलण्याचे आवाहन केले, असे अर्थ मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. यावेळी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सेबीप्रमुख आदी उपस्थित होते.

आरबीआयच्या ताज्या वार्षिक अहवालानुसार, मार्च २०२४ च्या अखेरीस बँकांमधील दावा न केलेल्या ठेवींमध्ये वार्षिक २६ टक्क्यांनी वाढ होऊन ती ७८,२१३ कोटी रुपये झाली आहे. मार्च २०२३ च्या अखेरीस ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधीची रक्कम ६२,२२५ कोटी रुपये होती.

भारतीय सिक्युरिटीज मार्केटमध्ये पीआयओ आणि ओसीआयसह अनिवासी भारतीयांसाठी डिजिटल ऑनबोर्डिंगसह केवायसी प्रक्रियेचे सामान्य केवायसी नियम, सरलीकरण आणि डिजिटलायझेशनची आवश्यकता आहे.

## एमएसएमई निर्यातदार वस्तूंच्या नोंदणीस मदत करण्याचा विचार

**बर्न :** देशाच्या परदेशी निर्यातीला चालना देण्यासाठी निर्यातदारांना, विशेषतः एमएसएमईंना नवीन बाजारपेठांमध्ये नवीन उत्पादने नोंदणी करण्यासाठी निधी देण्यासाठी सरकार एक योजना तयार करण्याचा विचार करत आहे, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सांगितले.

त्यांनी पुढे सांगितले की, अशा नोंदणीचा संपूर्ण खर्च सरकार करेल. मी अशी योजना आणण्याचा विचार करत आहे की ज्या कोणत्याही एमएसएमईला जगात कुठेही, विशेषतः नवीन उत्पादने, नवीन बाजारपेठा, नवीन निर्यातदारांसाठी त्यांच्या उत्पादनांची नोंदणी करण्यासाठी कितीही पैसे खर्च करावे लागतील, सरकार संपूर्ण खर्च भागवेल, असे गोयल ९ जून रोजी भारतीय व्यावसायिक प्रतिनिधी मंडळाला संबोधित करताना म्हणाले.

## भारत आणि 'ईएफटीए' व्यापार करार भागीदारीने उद्योगात स्थिरता येईल : गोयल

**बर्न :** भारत आणि चार देशांच्या युरोपियन गट 'ईएफटीए' यांच्यातील मुक्त व्यापार करार (एफटीए) या प्रदेशांमधील व्यवसाय, उद्योगाला स्थिरता, अंदाज आणि सातत्य आणेल, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी मंगळवारी सांगितले.



भारत प्रचंड बाजारपेठ आणि कुशल व्यावसायिक प्रदान करत असताना, स्विझर्लंडकडे प्रगत उत्पादन क्षमता आहेत, असे त्यांनी सांगितले. दोन्ही बाजूंनी १० मार्च २०२४ रोजी व्यापार आणि आर्थिक भागीदारी करार (टीईपीए) वर स्वाक्षरी केली.

या करारांतर्गत, भारताला १५ वर्षांत १०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक वचनबद्धता मिळाली आहे, तर स्विस घड्याळे, चॉकलेट आणि कापलेले आणि पॉलिश केलेले हिरे यासारख्या अनेक उत्पादनांना कमी किंवा शून्य शुल्कात परवानगी देण्यात आली आहे. युरोपियन मुक्त व्यापार संघटनेचे (ईएफटीए) सदस्य आइसलँड, लिकटेंस्टाईन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड आहेत. हा करार भागीदारीत स्थिरता, अंदाजेता आणि सातत्य देईल, असे गोयल यांनी येथे दोन्ही प्रदेशांच्या व्यावसायिकांना संबोधित करताना सांगितले.

हा करार ऑक्टोबरपासून कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. त्यांनी असेही सांगितले की भारताने कराराची मंजुरी प्रक्रिया पूर्ण केली आहे. दोन्ही बाजूंच्या कंपन्यांना या संबंधांचा फायदा घेण्याचे आणि व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देण्याचे आवाहनही त्यांनी केले. त्यांनी प्रमाणन सेवा प्रदान करण्यासाठी परस्पर प्रणालीची सूचनाही केली.

### भारतात थेट परकीय गुंतवणुकीत घट झाली नाही : वाणिज्य मंत्री

**बर्न :** जागतिक पातळीवर काही वेळा चढउतार होत असले तरी भारतात थेट परकीय गुंतवणुकीत (एफडीआय) घट झाली नाही. तसेच भारतात पुन्हा परकीय गुंतवणुकीचा प्रवाह येत आहे. सरकार सूचनांसाठी खुले आहे आणि देशात थेट परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन उपाययोजना स्वीकारेल, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी म्हटले आहे.

ते म्हणाले की, गेल्या अकरा आर्थिक वर्षांत (२०१४-२५), भारताने ७४८.७८ अब्ज अमेरिकन डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली, जी मागील अकरा वर्षांच्या (२००३-१४) तुलनेत १४३ टक्क्यांनी वाढली आहे. त्यामध्ये ३०८.३८ अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक झाली.

याव्यतिरिक्त, थेट परकीय गुंतवणुकीसाठी स्त्रोत देशांची संख्या २०१३-१४ मध्ये ८९ वरून २०२४-२५ मध्ये ११२ झाली. त्यामुळे गुंतवणूक केंद्र म्हणून भारताचे जागतिक आकर्षण वाढत आहे हे अधोरेखित होते.या आकडेवारीनुसार, मला वाटत नाही की कोणताही घटणारा ट्रेंड आहे.

## नॅब आय चिपळूणतर्फे ७५ हजार नेत्र शस्त्रक्रिया

**_दारिद्र्य रेषेखालील रुग्णसेवेचाही उच्चांक..**
**सुचय रेडीज अध्यक्ष-नॅब चिपळूण**

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण /वार्ताहर**




नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड अर्थात नॅब चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरी संचलित नॅब आय हॉस्पिटल चिपळूणने तब्बल ७५ हजार नेत्रशस्त्रक्रियांचा टप्पा यशस्वीरित्या ओलांडला आहे. या शस्त्रक्रियांमध्ये ३३ हजार ५०० पेक्षा अधिक शस्त्रक्रिया मोफत केल्या आहेत. *जागतिक दृष्टीदान दिवस* निमित्ताने या वाटचालीला विशेष महत्त्व प्राप्त झाला आहे. नॅब आय हॉस्पिटलमध्ये नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रेटीना उपचार तसेच ऑकीलोप्लास्टी अर्थात तिरळेपणा, पापणी पडणे अशा दोषासाठी उपचार एकाच छताखाली सर्व रूग्णांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी नॅब चिपळूण ओळखले जाते. रुग्णालयामध्ये ४ निवासी वैद्यकीय अधिकारी तसेच ४ व्हिजिटींग तज्ञ डॉक्टर कार्यरत असून त्यांना रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची साथ आहे. सन १९९५-९६ मध्ये १ हजार स्वेअर फूटाच्या जागेत सुरू झालेले रुग्णालय त्यानंतर १३ हजार स्वेअर फूट इतक्या प्रशस्त जागेत जिल्ह्यातील रूग्णांची मनोभावे सेवा करीत आहे. *नॅब-चिपळूणतर्फे जिल्ह्यातील दृष्टीबाधितांना शैक्षणिक, स्वयंरोजगार तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत आहे. अंधांना नॅब युनिट महाराष्ट्र व नॅब इंडियातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षणांसाठी पाठविण्यात येते*. यासाठी जिल्ह्यातील विविध प्राथमिक तसेच माध्यमिक शाळातील विद्यार्थी व शासकीय अधिकारी यांची मोठी मदत होत असल्याचे नॅबने म्हटले आहे.

*नॅबच्या महाराष्ट्रातील नेत्र चिकित्सा व शस्त्रक्रिया याबाबत राज्यात दुसरा क्रमांक नॅब-चिपळूणचा लागतो. ७५ हजार रूग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्यापैकी ३५ हजार शस्त्रक्रिया या मोफत स्वरूपात करीत नॅबने रत्नागिरी जिल्ह्यातील दारिद्ररेषेखालील रुग्णांना रुग्ण सेवेतून दिलेला दिलासा आत्मिक समाधान देणारा आहे.

## २.२ ट्रिलियन डॉलरच्या पायाभूत गुंतवणुकीमुळे सिमेंट उद्योगाला मोठा फायदा होईल

**नवी दिल्ली :** २०३० पर्यंत पायाभूत सुविधा क्षेत्रात अंदाजे २.२ ट्रिलियन अमेरिकन डॉलरच्या गुंतवणुकीमुळे सिमेंट उद्योगाला मोठा फायदा होईल, असे एसीसीचे अध्यक्ष करण अदानी म्हणाले.

एप्रिल २०२५ मध्ये १०० एमटीपीए क्षमतेचा टप्पा ओलांडणाऱ्या अदानी समूहाच्या सिमेंट व्यवसायाचा भाग असलेल्या एसीसी सिमेंटने उज्ज्वल भविष्यासाठी एक मजबूत, शाश्वत पाया रचून भारताच्या विकासात योगदान देत आहे, असे अदानी यांनी कंपनीच्या ताज्या वार्षिक अहवालात म्हटले आहे.

**करण अदानी यांना विश्वास**

२०३० पर्यंत भारताच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधा क्षेत्रात अंदाजे २.२ ट्रिलियन अमेरिकन डॉलरची गुंतवणूक आवश्यक असण्याचा अंदाज आहे. पायाभूत सुविधांच्या वाढीचा एक प्रमुख सक्षमकर्ता म्हणून, सिमेंट उद्योगाला या गुंतवणुकींमधून मोठा फायदा होईल, असे त्यांनी सांगितले.

सिमेंट क्षेत्र लक्षणीय विस्तारासाठी तयार आहे आणि या क्षमतेचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी त्याच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमांची रचना केली आहे, असे त्यांनी सांगितले. एसीसी ही अंबुजा सिमेंटचा एक भाग आहे, जी अब्जाधीश गौतम अदानी यांच्या नेतृत्वाखालील अदानी समूहाच्या सिमेंट व्यवसायाची मालकी आहे.

आम्ही एप्रिल २०२५ मध्ये १०० एमटीपीए सिमेंट क्षमतेचा टप्पा ओलांडला, ज्यामुळे आम्हाला आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत आमच्या महत्त्वाकांक्षी १४० एमटीपीए उद्दिष्टाच्या जवळ पोहोचवले आहे. भारतातील सर्वात वेगाने वाढणारा सिमेंट व्यवसाय म्हणून, आम्ही उज्ज्वल उद्यासाठी एक मजबूत, शाश्वत पाया रचून त्याच्या वाढीस हातभार लावत आहोत, असे करण अदानी म्हणाले.

## लोटे -परशुराम येथे अध्यात्मिक वारकरी गुरुकुलचा १२ जून रोजी भव्य शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण (प्रतिनिधी)--:**



श्री संत ज्ञानेश्वर माऊली जिवनमुक्ती धाम सेवा संस्थान यांच्या वतीने लोटे- परशुराम येथे अध्यात्मिक वारकरी गुरूकूलचा भव्य शुभारंभ गुरूवारी १२ जून रोजी होणार आहे. ह.भ.प पुरूषोत्तम महाराज मोरे व माणिक महाराज मोरे तसेच प्रसिद्ध उद्योजक कैलासशेठ नंदा यांच्या उपस्थितीत हा शुभारंभ होइल. या संस्थेच्या माध्यमातून अनाथ, निराधार, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष भगवान महाराज कोकरे यांनी पत्रकारांना दिली. संस्थेतर्फे लोटे येथे गोशाळा चालवली जाते. या संस्थेच्या माध्यमातून अध्यात्मिक वारकरी गुरूकूल सुरू केले जात आहे. यानिमीत्त १२ रोजी सकाळी ८ वाजता गणेशपूजन व श्री सत्यनारायण पूजा होइल. सकाळी १० वाजता ह.भ.प दादा महाराज मोरे (कोल्हापूर) यांचे किर्तन होइल. दुपारी १२ वाजता उद्घाटन समारंभ होइल. दुपारी महाप्रसाद, ४ वाजता वारकरी भजन, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ होइल. यावेळी महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे संपर्क प्रमुख ह.भ.प. जालिंदर काळोखे पाटील, विजय जगताप, रूपेश राजेशिर्के, भागवत महाराज भारती, ज्ञानेश शिगवण, प्रकाश सोलकर, विष्णू सोलकर, किशोर चौगुले, ज्ञानेश्वर रामाणे, राजेंद्र राजेशिर्के, गणपत येसरे, पांडुरंग रेवाळे, शिवाजी पालांडे, दत्ताराम आंब्रे, शशिकांत महाडीक, मोघरे गुरूजी, प्रसाद दळवी, पालकर महाराज, जनार्दन आंब्रे, आदी वारकरी सांप्रदायातील महाराज उपस्थित राहणार आहेत. तसेच जिल्ह्यातील किर्तनकार, गायक, पखवाजवादक यांचीही उपस्थिती लाभणार आहे. अध्यात्मिक वारकरी गुरूकूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासह अध्यात्मिक शिक्षण, निवास व्यवस्था, जेवण अन्य सुविधा मोफत उपलब्ध केल्या जाणार आहेत. या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात प्रवेश घेऊन शालेय शिक्षणासह हरिपाठ, किर्तन, प्रवचन, तबला, शास्त्रीय गायन, वारकरी चाली, रामकथा, भगवतगिता, संत चरित्र, शिवशंभू व शिवचरित्र, शिवकालीन युद्धकला, हार्मोनियम, पखवाजवादन शिकवले जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील गरजू, अनाथ मुलांनी येथे प्रवेश घ्यावा, असे आवाहन भगवान कोकरे महाराज यांनी केले आहे.

## गोरेगांव गोंदिया प्रतिनिधि देवेन्द्र दमाहे
## वटवृक्ष लावून, सुवासिनींना ग्रंथ भेट देत वटपौर्णिमेच्या दिल्या शुभेच्छा !



**दैनिक युवक आधार**
**गोरेगाव वार्ताहर**

गोरेगाव पोलीस स्टेशन परिसरात गुरूदेव युवा मंच, महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना समिती व महिला मंच गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने वटपौर्णिमा हा सण आगळ्यावेगळ्या उपक्रमाने साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत उपस्थित सुवासिनींना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रेरणादायी जीवनचरित्र देऊन त्यांच्या सामाजिक कार्याची जाणीव करून देण्यात आली. तसेच वटवृक्षाचे रोप लावून पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेशही देण्यात आला. उपस्थित मान्यवरांमध्ये पोलीस निरीक्षक पिपलेवार साहेब, पिएसआय घोलप साहेब, पोलीस विभागातील इतर कर्मचारी, तसेच संघटना पदाधिकारी – जिल्हाध्यक्ष हरिराम येळणे गुरूजी, गुरूदेव युवा मंच जिल्हाध्यक्ष उमराव डोलारे, महिला मंच उपाध्यक्षा सौ. संगीता घासले, सौ. लिनता लोखंडे, सौ. जयस्वाल भाभी, सौ. अनिता कटरे, सौ. वैशाली काठेवार, सौ. तुरकर भाभी व अनेक सजग सुवासिनी उपस्थित होत्या. सणाच्या निमित्ताने स्त्री शक्तीला वंदन करत, पर्यावरणपूरक वृक्षारोपण व समाजप्रबोधनाचे सुंदर उदाहरण या उपक्रमातून सादर झाले.